
रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

वर्ष १७ • अंक ६४
www.ramprahar.com
शनिवार, २१ सप्टेंबर २०२४ • पाने ८ • किंमत ₹ २

## तिरुपतीच्या प्रसादासंदर्भात केंद्राने मागवला अहवाल



**नवी दिल्ली** : आंध्र प्रदेशच्या प्रसिद्ध तिरुपती मंदिरातील प्रसादात प्राण्यांची चरबी मिसळली जात असल्याचे समोर आल्यानंतर आता केंद्र सरकारने याची गंभीर दखल घेतली आहे. केंद्रीय आरोग्यमंत्री जेपी नड्डा यांनी मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांच्याकडून याबाबत अहवाल मागवला आहे. आंध्र प्रदेशमधील आधीच्या जगन मोहन यांच्या वायएसआरसीपी सरकारने तिरुपती मंदिरातील लाडूमध्ये दर्जाहीन पदार्थ आणि प्राण्यांच्या चरबीचा वापर केला होता, असा आरोप मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी केला होता. गुजरातच्या प्रयोगशाळेत या प्रसादाची तपासणी करण्यात आली. यात लाडूत प्राण्यांची चरबी आणि माशांच्या तेलाचे अंश सापडल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. हे प्रकरण समोर आल्यानंतर वायएसआरसीपी सरकार निशाण्यावर आले आहे.

**अंतरंग**

रायगडातील ६० गावे होणार सौरप्रकाशित/२

भिलवलेतील ठाकरे गटाचे कार्यकर्ते भाजपमध्ये/५

चेन्नई कसोटीत बांगलादेशचा पहिला डाव गडगडला/८

# महायुतीच्या विजयासाठी कामाला लागा

## केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचे आवाहन; पनवेलमध्ये सत्कार

**पनवेल : वार्ताहर**

राज्यात होणाऱ्या विधानसभा तसेच अन्य निवडणुकांमध्ये महायुतीचे उमेदवार विजयी होण्यासाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावे, असे प्रतिपादन केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांनी केले. ते गुरुवारी (दि. १९) पनवेलमध्ये आयोजित समारंभात सत्काराला उत्तर देताना बोलत होते.

ना. रामदास आठवले हे सलग तीनदा केंद्रात मंत्री झाल्याबद्दल त्यांचा तसेच नवनिर्वाचित राज्यसभा खासदार धैर्यशील पाटील यांचा सत्कार समारंभ रिपाइं पनवेल महापालिका जिल्हा क्षेत्र आणि तालुका यांच्यातर्फे आयोजित



करण्यात आला होता.

या समारंभाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, खासदार धैर्यशील पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, भाजप प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, उपजिल्हाप्रमुख परेश पाटील, भाजप जिल्हा सरचिटणीस प्रकाश बिनेदार, माजी महापौर कविता चौतमोल, माजी नगरसेवक संतोष शेट्टी, आरपीआय कोकण प्रदेशाध्यक्ष प्रकाश मोरे, मुंबई प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ कासारे, रायगड जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड, पनवेल महापालिका जिल्हा क्षेत्र अध्यक्ष प्रभाकर कांबळे, प्रभारी मोहनिष गायकवाड, कार्याध्यक्ष मोहन गायकवाड, तालुकाध्यक्ष विजय पवार, मिलिंद कांबळे, प्रभू जाधव, विजय मोरे, कृष्णमिलन शुक्ला, दिनेश जाधव, ॲड. मंगेश धिवार, अंकुश साळवे आदी उपस्थित होते.

या वेळी ना. रामदास आठवले यांनी सांगितले की, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची व माझी जुनी दोस्ती आहे. ते दानशूर व्यक्तिमत्व म्हणून पूर्वीपासून प्रसिद्ध आहेत. त्यांचे सुपुत्र आमदार प्रशांत ठाकूर यांचे कार्यदेखील कौतुकास्पद आहे. (पान २ वर..)

## शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी प्रयत्नशील -पंतप्रधान मोदी



**वर्धा : प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या बहुआयामी प्रगतीचा नायक शेतकरीच राहणार असून त्याच्या समृद्धीसाठी सरकार सर्व आघाड्यांवर प्रयत्नशील राहणार असल्याची ग्वाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी (दि. २०) येथे दिली. पीएम विश्वकर्मा योजनेचा वर्षपूर्ती सोहळा स्वावलंबी मैदानात झाला. त्या वेळी ते बोलत होते.

या सोहळ्यास राज्यपाल डॉ.सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री जीतन राम मांझी, केंद्रीय राज्यमंत्री जयंत चौधरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार, राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर, वनमंत्री तथा पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, उद्योगमंत्री उदय सामंत, कौशल्य विकासमंत्री मंगलप्रभात लोढा, भाजप प्रदेशाध्यक्ष चंदशेखर बावनकुळे आदी उपस्थित होते.

या वेळी अमरावती येथील पीएम मित्रा पार्कचे ई-भूमिपूजन आणि आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र योजना व पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर महिला स्टार्टअप योजना या राज्य शासनाच्या दोन योजनांचा शुभारंभही पंतप्रधान मोदींच्या हस्ते झाला.

पीएम विश्वकर्मा योजनेच्या माध्यमातून पारंपरिकता व कौशल्याला नवीन ऊर्जा प्रदान करण्याचा संकल्प आम्ही केला आहे. ही योजना म्हणजे देशात हजारो वर्षापासून असलेल्या पारंपरिक कौशल्याचा वापर विकसित भारताचे स्वप्न साकारण्यासाठी करावयाच्या प्रयत्नांचा एक परिपूर्ण रोडमॅप आहे. या कौशल्यामध्ये सर्वाधिक भागिदारी अनुसूचित जाती-जमाती आणि इतर मागासवर्गीय समाजसमुहाची आहे. या समुहातील कारागिर उद्योजक व्हावेत, असा आमचा प्रयत्न असून त्यांनी देशाच्या अर्थव्यवस्थेत मोठे योगदान देण्यासोबतच सप्लाय चेनसारख्या व्यवस्थेचा भाग व्हावे, अशी अपेक्षा पंतप्रधान मोदींनी व्यक्त केली.

या वेळी पंतप्रधान मोदींनी अमरावती येथील पीएम मित्र पार्क, राज्यातील एक हजार आचार्य चाणक्य कौशल विकास केंद्रांचे उद्घाटन केले तसेच पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर महिला स्टार्टअप योजनेचा शुभारंभ केला. पीएम विश्वकर्मा योजनेच्या एक लाख कारागिरांना ओळखपत्र व प्रमाणपत्र तसेच एक लाख कारागिरांना डिजिटल कौशल्य प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. देशभरातील ७५ हजार कारागिरांना कर्जाचे वितरणही पंतप्रधानांच्या हस्ते आभासी पद्धतीने करण्यात आले.

## पोलीस भरती परीक्षेत इलेक्ट्रॉनिक डिवाईसचा वापर; १० जणांना अटक

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड पोलीस दलातील पोलीस शिपाई भरती लेखी परीक्षा केंद्रावर इलेक्ट्रॉनिक डिवाईस, इअर बड आदी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कॉपी करणारे उमेदवार व त्यांना मदत करणारे अशा एकूण १० जणांना रायगड पोलिसांनी अटक केली. या गुन्ह्यातील इतर आरोपींचा शोध पोलीस घेत आहेत.

१० ऑगस्ट रोजी रायगड जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवर सर्वसाधारण पोलीस शिपाईपदाच्या एकूण ३९१ जागांकरिता जिल्ह्यातील विविध केंद्रांवर लेखी परीक्षा घेण्यात आली. त्यात काही उमेदवारांनी गैरप्रकार केला होता. (पान २ वर..)

## विकासकामांच्या जोरावर विजय मिळवू -आमदार महेश बालदी





**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

गेल्या पाच वर्षात उरण विधानसभा मतदारसंघातील गावागावात, वाड्या-वस्त्यांवर विकासाचा निधी देऊन अनेक कामे केली आहेत. त्या जनतेच्या पाठबळावर व उमद्या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून पुन्हा विजय संपादन करू, असा ठाम विश्वास उरणचे आमदार महेश बालदी यांनी शुक्रवारी (दि. २०) व्यक्त केला.

मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त जेएनपीटी कामगार वसाहतीतील सभागृहामध्ये भाजपच्या वतीने रक्तदान शिबिर व कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी आमदार महेश बालदी बोलत होते. व्यासपीठावर आमदार प्रशांत ठाकूर, भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, उरण विधानसभा प्रभारी श्रीनंद पटवर्धन, तालुकाध्यक्ष रवी भोईर, शहराध्यक्ष कौशिक शाह, जिल्हा चिटणीस चंद्रकांत घरत, महिला अध्यक्ष राणी म्हात्रे, माजी नगराध्यक्ष सायली म्हात्रे, कामगार नेते सुरेश पाटील, सुधीर घरत, जितेंद्र घरत आदी उपस्थित होते. (पान २ वर..)

## निवडक

### काश्मिरमध्ये बस दरीत कोसळून चार जवानांचा मृत्यू

**बडगाम** : जम्मू-काश्मीरमध्ये निवडणुकीच्या कामात व्यस्त असलेली बीएसएफ जवानांची बस शुक्रवारी (दि. २०) बडगाम जिल्ह्याच्या ब्रेल गावात दरीमध्ये कोसळली. या अपघातात चार जवानांचा मृत्यू झाला असून २८ जवान जखमी झाले आहेत. बीएसएफच्या जवानांना घेऊन जात असताना बस एका कड्यावरून घसरल्याने हा अपघात झाला. या अपघातात बसचेही मोठे नुकसान झाले आहे.

### मुंबई विद्यापीठाची सिनेट निवडणूक पुन्हा स्थगित

**मुंबई** : येथील विद्यापीठाच्या १० नोंदणीकृत पदवीधर जागांसाठी येत्या २२ सप्टेंबर रोजी मतदान प्रक्रिया राबवली जाणार होती. राज्य सरकारचे आदेश प्राप्त झाल्यामुळे मुंबई विद्यापीठाच्या सिनेट निवडणुकीला स्थगिती देत असल्याची घोषणा मुंबई विद्यापीठाने जाहीर केली आहे. ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरेंनी ही निवडणूक अतिशय प्रतिष्ठेची केली होती, मात्र आता राज्य सरकारने ठाकरेंना मोठा झटका देताना काही तासांवर आलेल्या सिनेट निवडणुकीला स्थगिती दिली आहे.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी, मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त पनवेलमध्ये रक्तदान शिबिर उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती या काळात भारतीय जनता पक्षाच्या वतीने विविध सेवाकार्य असलेल्या सेवा पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पनवेल तालुका व शहर युवा मोर्चाच्या वतीने पनवेलमध्ये आयोजित रक्तदान शिबिराचे उद्घाटन शुक्रवारी (दि. २०) आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिरास प्रतिसाद लाभला.

(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)



पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात झालेल्या या शिबिराच्या उद्घाटनावेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष अनिल भगत, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, चारुशीला घरत, वृषाली वाघमारे, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, प्रल्हाद केणी, भूपेंद्र पाटील, अमरीश मोकल, अनुसूचित जाती मोर्चा जिल्हाध्यक्ष अमित जाधव, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, विश्वजीत पाटील, दिनेश खानावकर, महेश पाटील, सुनील पाटील, मयूर कदम, कोमल कोळी, एमजीएम हॉस्पिटलचे डॉ. राजेश तरदे, डॉ. शारदा आंचन यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.

लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या दूरदृष्टीतून लोककल्याणकारी विविध योजना अमलात आणून देशाला प्रगतिपथावर आणले. त्याचबरोबर योग्य निर्णय घेऊन देशाला बलशाली बनवले आहे. त्यामुळे आपला भारत हा जगात सामर्थ्यवान देश म्हणून उदयास आला आहे, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी केले. त्याचप्रमाणे कोकणात भाजपला मजबूत करण्याचे काम करणारे मंत्री रवींद्र चव्हाण हे ताकदवर नेते आहेत, असेही त्यांनी सांगितले.

देशाच्या सर्वांगीण विकासासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी काम करीत आहेत. प्रथम राष्ट्र, नंतर पक्ष त्यानंतर स्वतः या पक्षाच्या ध्येयधोरणाने काम करत असताना शेवटच्या घटकापर्यंत पोहचण्याचे काम होत आहे. साधी राहणी असलेले मंत्री रवींद्र चव्हाण यांनी कोकणात पक्षाला मोठी ताकद दिली. पक्ष संघटना वाढवत असताना त्यांचा लोकसंपर्कही मोठ्या प्रमाणात वाढला आहे. सर्वसामान्य व्यक्तीची जाण त्यांना आहे. वाढदिवसाला सेलिब्रेशन करण्याऐवजी सामाजिक कार्य करणारा भाजप आहे. त्या अनुषंगाने जास्तीत जास्त समाजसेवा झाली पाहिजे ही विचारसरणी घेऊन पक्ष काम करत आहे, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी म्हटले. या शिबिरात ६५ जणांनी रक्तदान करीत प्रतिसाद दिला.

सिडको
शहरांचे शिल्पकार

**नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पबाधितांकरिता जाहीर सूचना**

सिडकोतर्फे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पबाधितांना महाराष्ट्र शासनाने २२.५% योजने अंतर्गत मंजूर केलेले सर्वोत्तम पुनर्वसन पॅकेज देण्यात आलेले आहे. विमानतळ प्रकल्पबाधितांना येणाऱ्या काळात नवी मुंबईमध्ये खासगी क्षेत्रात निर्माण होणाऱ्या रोजगारविषयक संधींचा लाभ घेता यावा याकरिता त्यांना कौशल्य प्रशिक्षण देऊन सक्षम बनविण्याचे सिडकोचे उद्दिष्ट आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ बाधितांसाठी अभ्यासक्रम राबविण्याकरिता "सक्षम" कौशल्य विकास केंद्राच्या उभारणीची घोषणा सिडकोतर्फे करण्यात येत आहे. सदर अभ्यासक्रम हे महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, महाराष्ट्र शासन यांच्या अधिकृत केंद्रामार्फत राबविण्यात येणार आहेत. या संदर्भातील अद्ययावत माहिती, अर्ज व नोंदणी करण्याकरिता कृपया **https://cidco.maharashtra.gov.in/navi_mumbai_airport#gsc.tab=0** या लिंकचे अनुसरण करा. सदर लिंक दि. २५ सप्टेंबर २०२४ पासून उपलब्ध होणार आहे. लिंक वापरताना अडचण येत असल्यास **सिडको तारा प्रशिक्षण केंद्र, पहिला मजला, टॉवर क्र.५, सीबीडी बेलापूर रेल्वे स्थानक, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४** येथील सुविधा केंद्रास २५ सप्टेंबर २०२४ नंतर सकाळी १०.०० ते सायंकाळी ०५.०० या वेळेत भेट द्यावी.

**गीता अजित पिल्लई**
**मुख्य महाव्यवस्थापक**
**(परिवहन व विमानतळ)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/२३८/२०२४-२५

## रायगडात आजपासून गौरा गणेशोत्सव



**अलिबाग : प्रतिनिधी**

अनंतचतुर्दशीला गणेशोत्सवाची सांगता झाली असली तरी रायगड जिल्ह्यात शनिवारी (दि. २१) साखरचौथीच्या म्हणजेच गौरा गणपतींचे आगमन होत आहे. साधारणतः दीड दिवसाच्या मुक्कामानंतर या बाप्पाला निरोप दिला जातो.

रायगड जिल्ह्याच्या उत्तर भागात गौरा गणेशोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. अनंत चतुर्दशीनंतर येणाऱ्या पहिल्या संकष्ट चतुर्थीच्या दिवशी या गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना केली जाते. याला गौरा गणपती असेही म्हटले जाते. अलीकडच्या काळात दक्षिण रायगडातदेखील हा उत्सव साजरा केला जाऊ लागला आहे.

गणेश चतुर्थीला आलेल्या २१ दिवसांच्या गणपतींचा काही ठिकाणी अजनूही मुक्काम आहे. असे असतानाच मंगळवारी गौरा गणपतींचे आगमन होणार आहे. पितृपक्षात साजरा होणारा हा एकमेव उत्सव आहे. घरगुती आणि सार्वजनिक अशा दोन्ही स्वरूपांत हा उत्सव साजरा होतो.

गौरा गणेशोत्सव कसा सुरू झाला याचा नेमका उल्लेख सापडत नाही, परंतु श्रमिकवर्ग गणेश चतुर्थीच्या दिवसापर्यंत काम करीत असतो. त्यामुळे त्यांना गणेशोत्सव साजरा करता येत नाही. म्हणून गौरा गणेशोत्सवाला सुरुवात झाल्याचे काहीजण सांगतात. पनवेलमध्ये महात्मा ज्योतिबा फुले हातगाडी संघटना गौरा गणेशोत्सव मंडळ भाजी मार्केटचा राजा आकर्षण असतो. याशिवाय इतरही ठिकाणच्या गणरायांचे शुक्रवारी वाजतगाजत आगमन झाले आहे.

## श्वानदंश झालेल्या व्यक्तीचा मृत्यू

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील रिस येथे एका पिसाळलेल्या कुत्र्याने नऊ जणांना चावा घेतला होता. यापैकी संजू उर्फ शरीफ शेख (वय ३४) यांनी चौक येथे जाऊन उपचार घेतले, मात्र आपल्या सलूनमध्ये काम करताना छातीमध्ये चमक आल्याने त्यांनी जवळील रुग्णालय गाठले. तेथील डॉक्टरांनी त्यांना पनवेल येथे जाण्यास सांगितले, मात्र जाताना हृदयविकाराचा झटका आल्यामुळे त्यांची प्राणज्योत मालवली.

या भटक्या कुत्र्याने दोन मुली, तीन तरुण तसेच सात ते आठ महिलांना चावा घेतलेला आहे. यानंतर वासांबे (मोहोपाडा) ग्रामपंचायतीने परिसरात मोकाट फिरणाऱ्या श्वानांची नसबंदी करण्याचा निर्णय घेतला असून याला पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी दुजोरा दिला आहे.



## निवडक

### पोलीस असल्याचे सांगून चोरी

**पनवेल :** पोलीस असल्याचे सांगून सोन्याची चैन आणि लॉकेट चोरून नेल्याचा प्रकार पळस्पे गावाजवळ घडला आहे. याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात अनोळखी व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. ६३ वर्षीय जनार्दन दामोदर मते हे कुडावे, पळस्पे येथे राहत असून खंडेराया हॉटेलच्या पुढे जेडब्ल्यूसी कंपनीच्या बाजूला, सर्विस रोडवर, पळस्पे गाव येथे आले असता ३५ ते ४० वर्षीय व्यक्तीने पोलीस असल्याचे त्यांना सांगितले आणि त्यांच्याकडील सोन्याची चैन आणि लॉकेट हे गळ्यातून काढण्यास सांगितले. ते त्यांच्या स्कूटीच्या डिक्कीत ठेवल्याचे भासवून ते स्कूटीच्या डिक्कीत न ठेवता फसवणूक करून घेऊन गेले. ३० ग्रॅम वजनाची सोन्याची चैन आणि लॉकेट पळवून नेल्या प्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

### अपहृत मुलगी पालकांकडे सुपूर्द

**पेण :** येथील चिंचपाडा कडूनगर येथून १६ वर्षीय अल्पवयीन मुलीला फूस लावून पळवून नेल्याची घटना घडली होती. पोलीस ठाण्यात तक्रार दाखल होताच मुलीचा शोध घेण्यात आला. त्यानुसार ही मुलगी सांगोला येथे पोलिसांना मिळाली. तिला ताब्यात घेऊन पालकांकडे सुपूर्द करण्यात आले आहे. मुलीचे अपहरण करणारा आरोपी पोलिसांच्या ताब्यात आहे. पोलिसांच्या पथकाने सांगोला येथून अपहरण केलेल्या मुलीस सुखरूप ताब्यात घेऊन पेण पोलीस ठाणे येथे आणले. आणि पालकांच्या ताब्यात दिले. गुन्ह्याच्या अनुषंगाने आरोपीस अटक करण्यात आलेली असून अधिक तपास सुरू आहे. गुन्ह्याचा तपास सुरू आहे.

### ट्रकच्या धडकेमुळे कारचे नुकसान

**पनवेल :** भरधाव वेगाने आलेल्या ट्रकने कारला धडक दिल्याने यात कारचे नुकसान झाले. या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पंकज कुमार यांच्यासोबत अभिजित देशवंडीकर हे होंडा सिटी मोटर कार (एमएच ०३ सीएम ३११८)ने कंपनीच्या कामासाठी तुर्भे येथून रसायनी येथे जात होते. दुपारी साडेतीनच्या सुमारास सोमटणे फाटा या ठिकाणी ट्रक (एमएच ४६ बीबी ७८७८) वरील चालक राजेश कुमार हरिजन याने त्याच्या ताब्यातील ट्रकची कारला पाठीमागून धडक बसली यात कारचे नुकसान केले. या प्रकरणी ट्रक चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

### अल्पवयीन मुलीवर बलात्कार

**पनवेल :** तेरा वर्षीय मुलीवर बलात्कार केल्याप्रकरणी आरोपीविरोधात शहर पोलीस ठाण्यात पोक्सोसह बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला. यातील पीडित मुलगी पनवेल रेल्वे स्टेशन रोड परिसरात राहणारी असून तिचे अपहरण केल्याप्रकरणी आरोपी फैय्याज महंमद शेखविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर त्या मुलीचा शोध घेतला असता तिने आरोपीने त्याच्या घरात नेऊन तिच्यावर अत्याचार केल्याची माहिती पोलिसांना दिली. आरोपीला अद्याप अटक करण्यात आली नाही. महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक सुषमा पाटील अधिक तपास करत आहेत.

### वाढदिवसानिमित्तचे कार्यक्रम रद्द

**उरण :** सर्वांचे लाडके व भोईर कुटुंबाचे ज्येष्ठ, विजय भोईर व विकास भोईर यांचे चुलत भाऊ (दादा) कै. किसन सखाराम भोईर यांचे शनिवारी (दि.१४) निधन झाले. त्यामुळे नवघरच्या विजय विकास सामाजिक संस्थेतर्फे आयोजित करण्यात आलेले कार्यक्रम रद्द करण्यात आले आहे. विजय भोईर (रायगड जिल्हा परिषद सदस्य) व विकास भोईर (प्रोप्रायटर-ब्लू स्टार सिक्युरिटी व फैसीलिटी सर्विसेस) यांच्या वाढदिवसाप्रित्यर्थ आयोजित केलेले होते. विविध कार्यक्रम येत्या २२ सप्टेंबर रोजी होणार होते. हे सर्व कार्यक्रम रद्द करण्यात आले आहे. अशी माहिती विजय विकास सामाजिक संस्थेने दिली आहे.

### अमली पदार्थविरोधी जनजागृती

**खारघर :** येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शुक्रवारी (दि.२०) राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे अमली पदार्थ सेवनाविरोधी सत्राचे आयोजन केले होते. तेजल खेडेकर व हर्षल तांडेल यांनी आपल्या महाविद्यालयाच्या परिसरात कोणी ड्रग्स विक्री व सेवन करत असेल तर ११२ वर कॉल करण्याचे आवाहन प्राध्यापकांना व विद्यार्थ्यांना या वेळी केले. कार्यक्रमाला प्रभारी प्राचार्य डॉ. माहेश्वरी झिरपे यांच्यासह विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते. या सत्रासाठी प्रा. प्रथमेश ठाकूर, प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. राहुल कांबळे, प्रा. नीलम मोरे, प्रा. मनोज यादव तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# रायगडातील ६० गावे होणार सौरप्रकाशित

## ◆ केंद्र सरकारकडून एक कोटींचे अर्थसहाय्य ◆ पीएम सूर्यघर मोफत बिजली योजनेची बैठक

**अलिबाग : प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या सोलार व्हिलेज योजनेच्या अंतर्गत रायगड जिल्ह्यातील पाच हजार लोकसंख्येची ६० गावे लवकरच सौर उर्जेवर स्वयंप्रकाशीत होणार आहेत. या प्रकल्पासाठी केंद्र सरकारच्या वतीने एक कोटी रुपयांचे अर्थसहाय्य दिले जाणार आहे.



२०३०पर्यंत देशात अपारंपरिक उर्जा स्त्रोतामधून ५०० मेगावॅट वीज निर्मिती करण्याचे उद्दीष्ट ठेवले आहे. यातील पन्नास टक्के वीज निर्मीती सोलारच्या माध्यमातून व्हावी यासाठी प्रयत्न सरू आहेत. ही बाब लक्षात घेऊन घरोघरी सौर उर्जेतून वीज निर्मिती करण्याचे ध्येय ठेवण्यात आले आहे. यासाठीच प्रधानमंत्री सुर्य घर योजनेची सुरूवात करण्यात आली आहे.

प्रधानमंत्री सुर्यघर योजनेचा आढावा घेण्यासाठी जिल्हास्तरीय आढावा बैठक शुक्रवारी (दि. २०) जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ही माहिती देण्यात आली. जिल्ह्यात पाच हजारपेक्षा अधिक लोकसंख्या असलेली ६० गावे आहेत. या गावांमधून एका गावाची निवड सोलार व्हिलेज प्रकल्पासाठी केली जाणार आहे.

जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचयात विभागाने महावितरणच्या मदतीने गावाची निवड करावी, स्थानिक ग्रामपंचायतींना विश्वासात घेऊन, त्यांच्याशी चर्चा करावी, सकरात्मक सहभाग देण्याची तयारी असलेल्या गावाची या योजनेसाठी निश्चिती करावी. महावितरणच्या वतीने ग्राहकांची संख्या वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत, सुर्य घर योजनेच्या प्रसिध्दीसाठी प्रयत्न करावेत, बँकांनी या प्रकल्पासाठी कर्ज सुविधा उपलब्ध करून द्यावी ,असे निर्देश सामान्य प्रशासन विभागाचे उपजिल्हाधिकारी डॉ. रवींद्र शेळके यांनी या बैठकीत दिले.

या बैठकीला महावितरणचे अधीक्षक अभियंता राजाराम माने, अधिक्षक अभियंता संजय पाटील कार्यकारी अभियंता शैलेश कुमार, उपमुख्य कायकारी अधिकारी ग्रामपंचायत विभाग राजेंद्र भालेराव आदी उपस्थित होते.

रायगड विभागासाठी एक लाख १६ हजार १०० लाभार्थ्यांचे उद्दीष्ट देण्यात आले आहे, मात्र ऑगस्ट अखेरपर्यंत तीन हजार ७२३ जणांनी योजने अंतर्गत अर्ज केले आहेत. त्यामुळे रायगड जिल्ह्यात प्रधानमंत्री सुर्य घर योजनेला अतर्ल्प प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येत आहे. एक हजार ८४९ ग्राहकांनी या योजनेचा प्रत्यक्ष लाभ घेतला आहे.

### *सोलार पंप योजनेबाबत शेतकऱ्यांना आवाहन*

***ऊर्जा सौर घर योजनेप्रमाणेच रायगड जिल्ह्यात सोलार पंप योजनेला शेतकऱ्यांचा अत्यल्प प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना योजनेचा लाभ मिळावा यासाठी प्रयत्न करण्याचे निर्देश त्यांनी या वेळी दिले. जिल्ह्यात १५३ जणांनी सौर पंपासाठी अर्ज केले असून, ५३ अर्ज तांत्रिक कारणामुळे बाद झाले आहेत. त्यामुळे जेमतेम शंभर लोकांना या योजनेचा लाभ मिळाला आहे. शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी आवाहन प्रशासनाने केले आहे.***

## नवीन पनवेल येथे चाणक्य केंद्र सुरू



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका कार्यक्षेत्रासाठी नवीन पनवेल येथे पिल्लई कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स, अ‍ॅण्ड सायन्स महाविद्यालयात शुक्रवारी (दि.२०) आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र सुरू करण्यात आले आहे.

या केंद्रांच्या माध्यमातून महाविद्यालयीन युवक युवतींना रोजगारक्षम बनविण्याचा बाबत मा. मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजगता व नावीन्य विभागाचा मानस आहे. या उद्घाटन कार्यक्रमावेळी पिल्लई कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स, अ‍ॅण्ड सायन्स महाविद्यालयामध्ये महापालिकेचे समाज विकास विभाग उपायुक्त रविकिरण घोडके, विभाग प्रमुख प्रकाश गायकवाड, समाज विकास अधिकारी स्वप्नाली चौधरी, महाविद्यालयाचे उपप्राचार्य दीपिका शर्मा, विभाग प्रमुख कविता कठारे, समन्व्यक आरती सुकेजा, प्राध्यापक शबाब रिजवी, शर्दुल बुवा उपस्थित होतो.

या कार्यक्रमात उपायुक्त रविकिरण घोडके आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेची माहिती दिली. या योजनेत बारावी पास, आय.टी. आय., पदविका, पदवी व पदव्युत्तर शैक्षणिक पात्रता धारण केलेल्या युवकांना अधिकाधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहे.

याचबरोबर त्यांना विद्यावेतनदेखील मिळणार आहे. खासगी क्षेत्रामध्ये एमआयडीसी क्षेत्रातील विविध कंपन्या, हॉटेल्स,कंस्ट्रशन क्षेत्रात प्रशिक्षनार्थी म्हणून सहा महिन्यांकरीता नियुक्ती देण्याची माहिती दिली. या वेळी पिल्लाई महाविद्यालयाने महापालिकेस सहकार्य करण्यातबाबत सहमती दर्शवली.

## मराठी भाषेतील भव्य महानिबंध स्पर्धा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे सर्वधर्म समभाव आणि अहिंसावादी तत्त्वज्ञान नव्याने समजून घेण्यासाठी प्रथमच मराठी भाषेतील भव्य महानिबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

या निबंध स्पर्धेचा विषय राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांचे विचार आणि आजची प्रस्तुतता असा आहे. स्पर्धेत प्रथम येणाऱ्यास ५,००,००० रुपये (सन्मानचिन्ह, मानाचा फेटा, एक लाख रुपये रोख आणि चार लाखांची पुस्तके)(पुस्तक सौजन्य : निर्मिती प्रकाशन), द्वितीय येणाऱ्यास ३,००,००० रुपये (सन्मानचिन्ह, मानाचा फेटा, पन्नास हजार रुपये रोख आणि अडीच लाखांची पुस्तके) (पुस्तक सौजन्य : संवाद प्रकाशन) तर उत्तेजनार्थ येणाऱ्यांना ५० बक्षीसे ५,००० रुपये (प्रत्येकी पाच हजारांची पुस्तके) मिळणार आहेत. सहभागीस २,००० रुपयांची पुस्तके आणि सहभागाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

या स्पर्धेत प्रवेश घेण्याची अंतिम तारीख ३० ऑक्टोबर २०२४ असून निबंध पाठवण्याची अंतिम तारीख ३० नोव्हेंबर २०२४ आहे. या स्पर्धेचा निकाल ३० जानेवारी २०२५ (सायं. ६ वा.) जाहीर होईल व बक्षीस वितरण १२ मे २०२५ रोजी होणार आहे.

स्पर्धेबद्दल सविस्तर माहिती हवी असल्यास ९८९०५५४३४० या Whatsapp/Teligram नंबरवर राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांचे विचार आणि आजची प्रस्तुतता या महानिबंध स्पर्धेबद्दल सविस्तर माहिती पाठवा, असा मेसेज पाठवा.

या स्पर्धेचे मुख्य आयोजक महात्मा गांधीजी नवविचारमंच संवाद प्रकाशन कोल्हापूर हे आहेत. स्पर्धेत सर्व प्रथम लवकरात लवकर प्रवेश घेणाऱ्या फक्त ५०० स्पर्धकांनाच प्रवेश असेल.

## कर्जतमधील शिबिरात ५४ जणांचे रक्तदान

**कर्जत : प्रतिनिधी**

राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त कर्जत तालुका भाजपच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात ५४ रक्तदात्यांनी रक्तदान केले.



नेरळ येथील श्री अंबा माता मंदिर येथे रक्तदान शिबिर झाले. या शिबिराचे उद्घाटन ज्येष्ठ कार्यकर्ते केशव काळे यांचे हस्ते झाले. या वेळी पक्षाचे तालुका अध्यक्ष राजेश भगत, जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, विधानसभा निवडणूक प्रमुख किरण ठाकरे आणि फ्रेंड्स ऑफ भाजप जिल्हा संयोजक नितीन कांदळगावकर आदी उपस्थित होते. खोपोली येथील लक्ष्मी रक्तपेढी यांच्याकडून रक्त संक्रमण करण्यात आले. त्यासाठी डॉ देवांशी सिंग,तसेच आरोग्य कर्मचारी नाईक, प्रदीप नितोसे, सुमित यादव, प्रतीक्षा गावित, सेजल पाल, अनिकेत शर्मा, आकाश शर्मा, प्रियांधू सोनी, आकाश जगदाळे आर्दीनी रक्तसंक्रमण करण्याचे कार्य केले. या शिबिरात ५४ रक्तदात्यांनी रक्तदान करून मंत्री रवींद्र चव्हाण यांना शुभेच्छा दिल्या.

या वेळी माजी आमदार सुरेश लाड, कर्जत तालुका सरचिटणीस वसंत महाडिक, संदीप म्हसकर, माजी सरचिटणीस संजय कराळे, नेरळ शहराध्यक्ष संभाजी गरुड, भाजप महिला मोर्चाचे तालुका अध्यक्ष नम्रता कांदळगावकर, महिला मोर्चा नेरळ शहराध्यक्ष श्रद्धा कराळे, भाजप कर्जत उपाध्यक्ष अनिल जैन, भाजप किसान मोर्चा जिल्हा अध्यक्ष अतुल बडगुजर, कर्जत नगरपालिकेचे माजी उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल,युवा मोर्चा पदाधिकारी अभिषेक तिवारी, प्रीती तिवारी, चिंचवली ग्रामपंचायत उपसरपंच सुप्रिया भगत तसेच जोस्ना भगत, विठ्ठल भागीत, सचिन म्हसकर, जनार्दन म्हसकर, सखाराम कडाळे, प्रदीप विचारे, चंद्रकांत डायरे, विभाग अध्यक्ष केशव तरे, जयेश जोशी, दर्शन काबरी, रोशन पाटील, विराज पाटकर, मंगेश फुलावरे, नेरळ माजी शहर अध्यक्ष अनिल पटेल, कर्जत तालुका उपाध्यक्ष नरेश मसने, पंढरी हजारे, योगेश शहा, राजेश नाईक आदी कार्यकर्त्यांनी शुभेच्छा दिल्या.



**माथेरान : भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते विलास पाटील यांची भाजप व्यापारी आघाडी कर्जत तालुका सहसंयोजकपदी नियुक्ती करण्यात आली. त्यांना माजी आमदार सुरेश लाड यांनी नियुक्तीपत्र दिले. या वेळी तालुका अध्यक्ष राजेश भगत, जिल्हा सरचिटणीस दीपक बहिरे, भाजप नेते नितीन कांदळगावकर, माथेरान शहर उपाध्यक्ष सुभाष भोसले, संपर्क प्रमुख प्रदीप घावरे आदी उपस्थित होते.**

पान १ वरुन

### महायुतीच्या विजयासाठी कामाला लागा

पुढे बोलताना ना. आठवले यांनी कार्यकर्त्यांनी पदाच्या मागे न धावता समाजाचे काम करत रहावे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेली शिकवण अंगीकारावी व समाजासाठी झटावे. आपोआप पदे आपल्याला मिळतील, असे स्वानुभवावरून सांगितले. या वेळी त्यांनी स्वरचित कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सांगितले की, रिपाइंचे अध्यक्ष रामदास आठवले यांच्याबरोबर मी दिल्लीत काम केले आहे. त्यामुळेच आमचे संबंध भावासारखे घट्ट आहेत तसेच रिपाइंचे येथील पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यासोबत आम्ही कौटुंबिकरित्या एकत्रित काम करीत असतो.

नवनिर्वाचित खासदार धैर्यशिल पाटील यांनी ना. रामदास आठवले यांनी मला दिल्लीत मार्गदर्शन करावे व त्यांच्या कृपाछत्राखाली ठेवावे. जास्तीत जास्त केंद्राच्या योजना रायगड जिल्ह्यात राबविण्यासाठी प्रयत्न करू, असे सांगितले.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी केंद्र व राज्य शासनाच्या असणाऱ्या विविध योजना येथे राबविण्यासाठी आपण प्रयत्नशील असून एकसंघ राहून विकास करूया, असे म्हटले.

भाजप प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील यांनी आज महायुतीच्या आगामी निवडणुकांच्या प्रचाराचा नारळ फुटल्याचे सांगून आपण एकत्र राहून सर्व निवडणुका जिंकू, असे नमूद केले.

रिपाइं जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड, पनवेल महापालिका जिल्हाध्यक्ष प्रभाकर कांबळे यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्याध्यक्ष मोहन गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. या सत्काराच्या निमित्ताने विशाल सावंत प्रस्तुत भीमगीतांचा सदाबहार नजराणा भीमपर्व हा कार्यक्रम रंगला.

### पोलीस भरती परीक्षेत इलेक्ट्रानिक डिवाईसचा वापर; १० जणांना अटक

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये पवन त्रंबक बमनावत (वय २५, नळणी जि. जालना), नारायण निवृत्ती राऊत (वय, २९ रा. नाळवंडी, जि. बीड), प्रताप उर्फ भावड्या शिवसिंग गोमलाडू (वय २५, रा. वैजापूर जि. छत्रपती संभाजीनगर), नागम्मा हनुमंत इबीटदार (वय २०, रा. देगलूर जि. नांदेड), अर्जुन नारायण बेडवाल (वय २४, रा. परसोडा जि. छत्रपती संभाजीनगर), मंगेश बालाजी चोले उर्फ चोरमले (वय ३४, रा. जळकोट, लातूर), संतोष सांडू गुसिंगे (वय ३०, रा. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर), पूनम राम वाणी (वय २३, रा. पडेगाव, जि. छत्रपती संभाजीनगर), जीवन मानसिंग नायमने उर्फ एस.राठोड उर्फ करण जाधव (रा. जोडवाडी, जि. छत्रपती संभाजीनगर), जालिंदर श्रीराम काळे (वय ३२, रा. नाळवंडी, जि. बीड) यांचा समावेश आहे.

### विकासकामांच्या जोरावर विजय मिळवू -आमदार महेश बालदी

आपल्या भाषणात आमदार महेश बालदी यांनी विरोधकांचा खरपूस समाचार घेतला. माझ्या अगोदर येथे जे आमदार होते त्यांनी मतदारसंघात कोणताच विकास केला नसल्याने जनतेने त्यांना घरी बसविले, असे सांगून त्यांच्याकडे निवडणूक लढविण्यासाठी मुद्दाच नसल्याने ते जातीचा आधार घेऊन समाजात फूट पाडण्याचे काम करीत आहेत, मात्र येणारी ही निवडणूक जातीपातीच्या मुद्द्याची नसून विकासाच्या मुद्द्याची असल्याचे आमदार बालदी यांनी स्पष्ट केले. मी जनतेच्या घराघरात विकास पोहचविला असल्याने जनता मला नक्की साथ देईल, असेही ते म्हणाले.

गेल्या पाच वर्षात जेएनपीटीसाठी आठ पदरी मार्ग, दीडशे कोटी रुपयांचे करंजा बंदर, त्याचप्रमाणे ऐतिहासिक घारापुरी बेटावर स्वातंत्र्यानंतर वीज नेण्याचे काम मी केले असल्याचे आमदार महेश बालदी यांनी नमूद केले. मतदारसंघातील आदिवासी वाड्यांवर रस्ते बनवून त्यांचा सर्वांगीण विकास सुरू केला असून रानसई आदिवासी वाडीवर जाऊन विरोधकांनी ते पाहून घ्यावे. आम्ही फक्त गप्पा न मारता वास्तववादी विकासाला प्राधान्य देत असल्याने तरुणवर्ग मोठ्या प्रमाणात भाजपमध्ये दाखल होत आहे आणि तरुणवर्गाची ही ताकद माझा विजय सुकर करेल. विरोधकांनी कोणीही उमेदवार दिला तरी मी किमान २५ हजारांच्या मताधिक्याने निवडून येईन, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागून विरोधकांची दिवास्वप्ने उद्ध्वस्त करा, असे आवाहन केले. भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनीही मार्गदर्शन केले.

या वेळी आवरे, मोठी जुई, फुंडे, चिरनेर, डोंगरी आदी ठिकाणच्या विविध पक्षातील सुमारे अडीचशेच्या वर कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. त्यांचे आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी स्वागत केले.

मेळाव्यास माजी जि.प. सदस्य विजय भोईर, जीवन गावंड, भाजपचे उरण तालुका सरचिटणीस सुनील पाटील, उपाध्यक्ष प्रकाश ठाकूर, मुकुंद गावंड, उरण पूर्व विभाग अध्यक्ष शशी पाटील, महालण विभाग अध्यक्ष महेश कडू, जासई विभाग अध्यक्ष गोपी म्हात्रे, माजी उपनगराध्यक्ष जयविन कोळी तसेच अतुल पाटील, राजेश ठाकूर, हितेश शाह, संगीता पाटील, शमिता दत्ता ठाकूर, मनीषा म्हात्रे, हस्तीमल मेहता आदी पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, रक्तदान शिबिरात आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी रक्तदान केले. सुमारे ९६ रक्तदात्यांनी रक्तदान केले.



# खारघर, कळंबोलीत रक्तदान शिबिर

## पंतप्रधान मोदी, मंत्री रवींद्र चव्हाणांच्या वाढदिवसाचे औचित्य







**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा व राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून खारघर व कळंबोली येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

खारघर येथील शिबिराला भाजप मंडल अध्यक्ष भाजप प्रवीण पाटील, जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, माजी नगरसेवक अभिमन्यु पाटील, माजी नगरसेवक निलेश बाविस्कर, माजी नगरसेवक नेत्रा किरण पाटिल, वासुदेव पाटील, किरण पाटील, माजी नगरसेवक शत्रु काकडे, सरचिटणीस दीपक शिंदे, माजी नगरसेवक नरेश ठाकूर, समीर कदम, सचिन वासकर, अ‍ॅड. राजेंद्र अग्रवाल, बीना गोगरी, उत्तर भारतीय मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संतोष शर्मा, मंडळ उपाध्यक्ष संजय घरत, युवा मोर्चा अध्यक्ष नितेश अभिमन्यू पाटील, युवा मोर्चा सरचिटणीस अक्षय लोखंडे, प्रवीण बेरा, चिटणीस आदित्य हातगे, रामकुमार चौधरी, विनोद ठाकूर, लखविंदर सैनी, अजय माळी, संदीप मागाडे, सर्जेराव मेंगाणे, विश्वनाथ इंडी, सुस्मित डोलस, महिला मोर्चा अध्यक्षा साधना पवार, नीलम विसपुते, सिमा खडसे, निर्मला यादव, शुभ पाटील, प्रिया दलवी, प्रिया दलवी, स्मिता आचार्य, सुशीला शर्मा, गायत्री महापात्रा, श्यामला, झूमा चक्रबर्ती, अनिता जाधव, शोभा मिश्रा, युवती प्रमुख दुर्गा बंसल, रजनी शर्मा, स्नेहल बोधाई, दीपक ठाकूर, माजी नगरसेवक हरेश केणी, गुरुनाथ गायकर, रामचंद्र पाटील, संध्या सारबिंदरे, माजी नगरसेवक कुणाल सांगानी आदी उपस्थित होते.

भाजप कळंबोलीच्या वतीने मोफत आरोग्य शिबिर व भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. रा.स्व. संघ जनकल्याण समिती डॉ. प्रभाकर पटवर्धन स्मृती रुग्णालय, पनवेल व आशा हॉस्पिटल कळंबोलीनवी मुंबई ब्लड बॅंक यांच्या सौजन्याने मोफत सामुदायिक आरोग्य शिबिरामध्ये विनामूल्य तज्ज्ञ डॉक्टरांकडून रोग निदान, विनामूल्य आवश्यक शस्त्रक्रिया, विनामूल्य रक्त लघवी व ई.सी.जी तपासणी तसेच मोफत आयुष्मान कार्ड काढून देण्यात आले.

या वेळी भाजप कळंबोली मंडल अध्यक्ष रविनाथ पाटील, माजी नगरसेवक अमर पाटील, राजू शर्मा, नगरसेविका मोनिका माहनवर, प्रमिलाताई पाटील, सरचिटणीस दिलीप बिष्ट, संजय दोडके, उपाध्यक्ष आभा घुटूकडे, सुनील ढेम्बरे, जिल्हा सरचिटणीस उत्तर भारतीय मोर्चा राजेश पांडे, सचिव राजेंद्र बागल, सहकार सेलचे जिल्हा अध्यक्ष अशोक मोटे, तुषार जगदाळे, बायजा बारगजे, महिला मोर्चा सरचिटणीस दुर्गा सहानी, अध्यक्ष उत्तर भारतीय मोर्चा केशव यादव, अध्यक्ष युवा मोर्चा गौरव पवार, युवा मोर्चा सरचिटणीस निशांत गिल, प्रभाग अध्यक्ष चितरंजन शेट्टी, प्रकाश शेलार, घनश्याम शर्मा, रामा माहनवर, युवा नेता अमर ठाकूर आदी पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# समाजासाठी सकारात्मक योगदान द्यावे -लोकनेते रामशेठ ठाकूर

(छाया : अक्षय शार्दुल)



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनीमधील भागुबाई चांगू ठाकूर (बीसीटी) कॉलेज ऑफ लॉ येथे प्रथम वर्ष बीए एलएलबीच्या विद्यार्थ्यांसाठी अभिमुखता कार्यक्रम आणि स्वागत समारंभ शुक्रवारी (दि.२०) झाला. या वेळी समाजासाठी सकारात्मक योगदान द्यावे, असे आवाहन संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भाषणामध्ये केले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून लोकनेते रामशेठ ठाकूर असून मान्यवर पाहुणे म्हणून संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख व डॉ. एस. टी. गडदे यांची उपस्थिती लाभली.

महाविद्यालयाच्या सरचिटणीस (जीएस) प्रेरणा गायकवाड यांनी कार्यक्रमाने नवीन विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या प्रवासाची सुरुवात केली. अनामिका जोशी यांनी वक्तृत्वाने आदरणीय पाहुण्यांचा परिचय करून दिला आणि कार्यक्रमाची औपचारिकता ठरवली. सनवी देशमुख यांनी स्वागतपर भाषण केले, तर सहाय्यक. प्रा. धनश्री कदम यांनी बीए एलएलबी (BA LL.B) अभ्यासक्रम आणि विद्यार्थ्यांच्या प्रतीक्षेत असलेल्या शैक्षणिक उपक्रमांची विस्तृत ओळख करून दिली.

प्राध्यापक सदस्यांची ओळख करून देण्यात आली आणि महाविद्यालयाच्या विविध समित्यांची रूपरेषा विद्यार्थ्यांना त्या ठिकाणी असलेल्या सपोर्ट सिस्टीम समजून घेण्यात मदत करण्यात आली. यानंतर लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह इतर मान्यवरांचे प्रेरणादायी भाषण झाले.

कार्यक्रमाची सांगता अपूर्व जाधव यांनी आभार मानून कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार व्यक्त केले. हा अविस्मरणीय प्रसंग टिपण्यासाठी वंदे मातरम गायनाने आणि फोटो सत्राने दिवसाची सांगता झाली.

या अभिमुखतेने विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांना महाविद्यालयाची संस्कृती, दृष्टी आणि शैक्षणिक अपेक्षा यांची सखोल माहिती दिली, ज्यामुळे प्रत्येकजण पुढील शैक्षणिक वर्षासाठी उत्साही होता. ३० सप्टेंबर २०२४ पासून पहिल्या वर्षाच्या बीए एलएलबी अभ्यासक्रमासाठी व्याख्याने सुरू होतील, २५ सप्टेंबर २०२४ रोजी वेळापत्रक शेअर केले जाईल.

# आमदार प्रशांत ठाकूर करंडक वक्तृत्व स्पर्धेची आंतरशालेय फेरी

### परेश ठाकूर यांची उपस्थिती





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर करंडक २०२४ वक्तृत्व स्पर्धेची मेगा ग्रॅंड फिनाले आंतरशालेय फेरी सीकेटी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात झाली. या वेळी कोशिश फाऊंडेशनचे अध्यक्ष व पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांची उपस्थिती लाभली.

या स्पर्धेची सुरुवात सहा शाळांमध्ये झाली असून १४,०९६ हून अधिक विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला होता. शाळांमध्ये अनेक फेऱ्यांनंतर, ११४ विद्यार्थ्यांनी त्यांचे सार्वजनिक बोलण्याचे कौशल्य दाखवले, २४ विजेते लवकरच घोषित केले जातील.

सीकेटी कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत ऑगस्टमध्ये या कार्यक्रमाचे उद्‌घाटन झाले. चेतन जाधव आणि अ‍ॅड. चिन्मय समेळ, ज्यांनी विद्यार्थ्यांचे संवाद कौशल्य आणि आत्मविश्वास वाढवण्यावर भर दिल्याबद्दल या उपक्रमाचे कौतुक केले.

या स्पर्धेत खारघरचे रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल तसेच लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल, नवीन पनवेलमधील सीकेटी विद्यालय, कामोठे येथील सुषमा पाटील, उलवे येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल या शाळांनी सहभाग घेतला होता.

वॉल ऑफ एक्स्प्रेशन क्रियाकलाप हा कार्यक्रमाचा एक विशेष आकर्षण होता. या उपक्रमामागील दूरदर्शी कोशिश फाऊंडेशनचे अध्यक्ष परेश ठाकूर यांनी अशा उपक्रमांच्या महत्त्वावर भर देताना सांगितले की, सार्वजनिक बोलणे ही नेतृत्वाची फक्त एक बाजू आहे. आत्मचिंतन करणेही तितकेच महत्त्वाचे आहे, आणि त्यांची शक्ती आणि क्षेत्रे ओळखून सुधारणा, विद्यार्थी वैयक्तिक उत्कृष्टतेच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलतात.

या कार्यक्रमात डी.डी. विसपुते शिक्षण महाविद्यालय प्राचार्या अ‍ॅड. सीमा कांबळे, प्रा.डॉ.सूर्यकांत परकाळे, प्रा.डॉ. आर.व्ही.येवले, प्रा. नमिता अखौरी, आकाश पाटील आदी उपस्थित होते.

या स्पर्धेने विद्यार्थ्यांना स्वतः ला अभिव्यक्त करण्यासाठी, नेतृत्व कौशल्ये विकसित करण्यासाठी आणि आत्मविश्वास मिळवण्यासाठी, भविष्यातील उपक्रमांसाठी एक नवा बेंचमार्क स्थापित करण्यासाठी यशस्वीरित्या एक व्यासपीठ प्रदान केले आहे.

# कळंबोली येथे सिलिंडरचा स्फोट

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली गावातील गणेश सृष्टी रहिवाशी संस्थेतील सहा मजल्यावरील एका घरात सिलिंडरचा स्फोट झाल्याची घटना शुक्रवारी (दि. २०) घडली आहे. या घटनेत सुदैवाने कोणत्याही प्रकारची जीवितहानी झाली नाही, मात्र स्फोटामुळे आजूबाजूच्या घरांचे नुकसान झाले असल्याची माहिती प्रत्यक्षदर्शिनी दिली आहे.

स्फोटाच्या तीव्रतेमुळे गणेश सृष्टी इमारतीतील या घराची बाहेरील भिंत पूर्ण पणे तुटली असून, तुटलेल्या भिंतीचे तुकडे आजूबाजूला उडून इमारती शेजारील घरांचे यामुळे नुकसान झाले आहे. तसेच स्फोटात फुटलेल्या सिलेंडरचे तुकडेदेखील इमारती खाली विखूरले आहेत.

महत्वाचे म्हणजे बंद असलेल्या या खोलीत झालेला हा स्फोट नक्की कशामुळे झाला याबाबत माहिती मिळाली नसून, घटनेनंतर घटनास्थळी पोहचलेले अग्निशमन दलाचे जवान आणि पोलीस अधिकारी स्फोट कशामुळे घडला याचा तपास करत आहेत.



**पनवेल : भाजप युवा नेते अमर ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी ज्येष्ठ नेते वाय.टी.देशमुख, जमीर शेख आदी उपस्थित होते.**



**पनवेल : रयत शिक्षण संस्थेमध्ये दरवर्षी कर्मवीर पारितोषिक देऊन विद्यालय आणि महाविद्यालयांचा सत्कार करण्यात येतो. त्यानुसार यंदाच्या वर्षी रायगड विभागातील गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेज तसेच वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाला यंदाच्या वर्षी कर्मवीर पारितोषिक येत्या २२ सप्टेंबरला देण्यात येणार आहे. याबद्दल गव्हाण विभागाच्या वतीने रयत शिक्षण संस्थेचे मॅनजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे शुक्रवारी अभिनंदन करण्यात आले. या वेळी प्राचार्य गोवर्धन गोडगे, रयतचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर, शिक्षक देवेंद्र म्हात्रे, सागर रंधवे, राजेंद्र चौधरी उपस्थित होते.**

# खारघरमध्ये महिला सुरक्षितता आणि शिष्यवृत्ती कार्यशाळा



**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात वुमेन डेव्हलपमेंटसेलच्या वतीने शुक्रवारी (दि. २०) महिला सुरक्षितता व शिष्यवृत्तीवर कार्यशाळेचे आयोजन केले होते.

या कार्यशाळेसाठी प्रमुख व्यक्ते म्हणून नवी मुंबई क्राईम ब्रॅंच वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ. विशाल माने यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. या कार्यशाळेसाठी प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी या कार्यशाळेमध्ये महाविद्यालयातील सर्व विद्यार्थिनींनी उस्फुर्त असा प्रतिसाद दिल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. या कार्यशाळेचे आयोजन प्रा. सोनी पांडे यांनी केले तसेच प्रा. विशाल देशमुख, प्रा. डॉ. दीपिका हसीजा, प्रा. शितल चव्हाण व डॉ. पूजा लांजेकर तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# पिरकोन येथे १०० विद्यार्थ्यांना गणवेश वाटप

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील पिरकोन येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय पिरकोन येथे जे.आर. लॉजिस्टिकचे डायरेक्टर जितेंद्र कटारमल यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आणि येणाऱ्या कर्मवीर भाऊराव पाटील अण्णाच्या जयंतीचे औचीत्य साधून गुरुवारी (दि. १९) शाळेतील १०० विद्यार्थ्यांना गणवेश वाटप केले.

शाळेतील मुलांना गणवेशाची नितांत आवश्यकता होती. उरण तालुका भाजप उपाध्यक्ष मुकुंद गावंड यांनी हे जीतूभाई यांच्या निदर्शनास आणले. त्यांनी ताबडतोब हे मान्य केले. वाटपावेळी पिरकोन गावातील थेट सरपंच कलावती पाटील, उरण तालुका भाजप उपाध्यक्ष मुकुंद गावंड, माजी विभागप्रमुख अनिल पाटील, माजी सरपंच के.वाय.गावंड, माजी उपसरपंच राजश्री म्हात्रे, पिरकोन ग्रामपंचायत सदस्य अनिता गावंड, प्रा. सुजाता बल्लाळ, मनसेचे नेते नितीन म्हात्रे, युवक नेते नवनीत गावंड, हर्षद भुरे, पूरण पाटील सर, बालाजी सर, सर्व शिक्षक शाळेतील स्टाफ, शाळेतील सर्व मुले मुली उपस्थित होते.

विभागप्रमुख अनिल पाटील यांनी आपल्या भाषणात सांगितले की, या शाळेला जी जितेंद्र कटारमल यांनी मदत केली आहे ती खूप अनमोल आहे. आमदार महेश बालदी यांची आम्हा मंडळींना नेहमीच शिकवण असते की, सामाजिक बांधिलकी म्हणून समाजाची सेवा करा मदत करा. सर्वांना मदतीचा हात द्या. निराधार यांना मदत करा. या प्रमाणे आम्ही करीत आहोत, असे उरण तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड यांनी आपल्या भाषणात सांगितले. त्याचप्रमाणे त्यांनी जितेंद्र कटारमल यांचे आभार मानले. कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयातील सर्व शिक्षकांनी जितू भाईचे यांचे आभार मानले.





**पनवेल : भाजप युवा मोर्चा पनवेल ग्रामीण अंतर्गत प्रभाग २च्या सरचिटणीसपदी आनंद सोनावणे नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबतचे नियुक्तीपत्र भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते देण्यात आले. या वेळी युवा मोर्चा रायगड जिल्हा सरचिटणीस दिनेश खानावकर, आशिष कडू, सुमित मिश्रा, प्रभाग क्रमांक २ अध्यक्ष शुभम खानावकर, राजेश पाटील, अनंत कांबळे, मिलिंद झुरे, वैभव पाटील, भूपेंद्र पाटील, आनंद ढवळे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**





**पनवेल : वडघर शाळेतील शिक्षक जयदास बाबुराव घरत यांना रायगड जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाला आहे. त्याबद्दल त्यांचे आमदार प्रशांत ठाकूर व भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी अभिनंदन केले. या वेळी संदीप मोरेश्वर घरत उपस्थित होते.**

## संपादकीय

# कार्यसंस्कृती बदलावी

कॉर्पोरेट जगतातील कामाचा अतिताण या विषयावर इतके दिवस खासगी वर्तुळात चर्चा होत होती, पण आता एका २६ वर्षीय तरुणीच्या आईने आपल्या मुलीचा मृत्यू कामाच्या अतिताणामुळे झाल्याचे पत्र संबंधित कंपनीच्या अध्यक्षांना लिहिल्यामुळे कार्यसंस्कृतीविषयीची चर्चा सुरू झाली आहे.

**आताची तरुणाई कष्टपूर्वक टोकाच्या स्पर्धेला तोंड देत उच्च शिक्षण घेते. त्यानंतर बलाढ्य कंपन्यांमध्ये काहींना गलेलठ्ठ पगाराच्या नोकऱ्या लागतात, परंतु तिथे वेतनाच्या बदल्यात त्यांच्याकडून 'मरेस्तोवर' काम करून घेतले जाते असे बोलताना सर्रास म्हटले जाते, परंतु सहज काढल्या जाणाऱ्या या उद्गारांमागे कॉर्पोरेट जगतातील भीषण कार्यसंस्कृतीचे वास्तव तर नाही ना, असा प्रश्न पडावा अशी चर्चा एका तरुण मुलीच्या दुर्दैवी मृत्यूने सुरू झाली आहे. केरळमधील ना सेबॅस्टियन पेरायिल ही २६ वर्षांची तरुणी २०२३ मध्ये सीएची आव्हानात्मक परीक्षा उत्तीर्ण झाली. त्यानंतर मार्च २०२४ मध्ये अर्न्स्ट अँड यंग (ईवाय) या नामांकित अकाउटिंग आणि कन्सल्टिंग फर्मच्या पुण्यातील कार्यालयात ती एक्झिक्युटिव्ह म्हणून रुजू झाली, मात्र त्यानंतर अवघ्या चार महिन्यांत जुलैमध्ये तिचा मृत्यू झाला. नाचा मृत्यू कामाच्या अतिताणामुळे झाल्याचे पत्र तिच्या आईने नुकतेच त्या कंपनीच्या अध्यक्षांना पाठवले. आपल्या वाट्याला जे दु:ख आले, ते अन्य कुणाच्या वाट्याला येऊ नये म्हणून आपण हे लिहित आहोत असे म्हणत तिच्या आईने जे वास्तव मांडले, त्याच कार्यसंस्कृतीत आज अनेक भारतीय तरुण राबत असल्याची चर्चा त्यामुळे सुरू झाली. केंद्रीय कामगार मंत्रालयानेही या चर्चेमुळे या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेतली असून नाचा मृत्यू नेमका कशामुळे झाला याची चौकशी होणार आहे. कामाच्या ठिकाणचे वातावरण शोषण करणारे होते का, याची चौकशी केली जाईल असे मंत्रालयाने म्हटले आहे. नाने ईवायमध्ये रुजू होण्यापूर्वी दोन वर्षे अन्य एका कंपनीत ऑडिट असिस्टंट म्हणून काम केले होते. ईवायमध्ये रुजू होतानाच तिला तिच्या टीमचे बरेच कर्मचारी कामाच्या प्रचंड ताणामुळे नोकरी सोडत असल्याचे ध्यानात आले होते, परंतु बड्या कंपनीतील पहिलीच नोकरी असल्यामुळे तिने मात्र अथक काम करण्याचा प्रयत्न केला. रुजू झाल्यानंतर लगेचच तिला निद्रानाश, चिंता आणि तणावाचा त्रास होऊ लागला असे तिच्या आईने पत्रात म्हटले आहे. मधल्या काळात छातीत दुखण्याच्या तक्रारीमुळे तिची ईसीजी तपासणीही करून घेण्यात आली, परंतु तिचे इकोकार्डियोग्राम सामान्य होते. या काळात दोन दिवस तिच्या सोबत काढलेल्या आईवडिलांनी तिला रात्रीच्या वेळी ऑफिसात बोलावले जाते, सकाळपर्यंत काम पूर्ण करून देण्यास सांगितले जाते. तिला आराम करायला वेळ मिळत नाही हे पाहिले. या परिस्थितीबद्दल तिने वरिष्ठांशी चर्चा केली असता, सगळेच रात्री जागून काम करतात, तुलाही करावे लागेल असे उत्तर मिळाले. नवीन रुजू झालेल्यांवर कामाचा अतिरिक्त ताण टाकण्याची कार्यसंस्कृती आपल्याकडे रूढ आहे का, हा प्रश्न आता चर्चिला जातो आहे. इन्स्टाग्रॅमसारख्या समाजमाध्यमावर यासंबंधीचे रील्स अनेकदा दिसतात. ईवाय कंपनीनेही या प्रकरणाची आपण गांभीर्याने दखल घेत आहोत असे आता म्हटले आहे. कामाच्या ठिकाणचा अतिरिक्त ताण ही जागतिक समस्या असली तरी भारतीयांमध्ये याचे प्रमाण अधिक असल्याचे काही अहवालांमध्ये दिसले आहे. आता सुरू झालेल्या चर्चेमुळे ही परिस्थिती थोडीफार तरी बदलावी इतकेच.**

# योजना-नागरिकांना जोडणारा उपक्रम मुख्यमंत्री योजनादूत

महाराष्ट्र शासन राज्यातील नागरिकांसाठी विविध कल्याणकारी योजना राबवत आहे. या लोककल्याणकारी योजनांचे प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी शासनाने शासन आपल्या दारी हा महत्त्वाकांक्षी उपक्रम प्रत्येक जिल्ह्यात सुरू केलेला होता. या उपक्रमाच्या माध्यमातून लाभार्थ्यांच्या दारापर्यंत जाऊन त्यांना शासकीय योजनांचा लाभ देण्यात येत होता. या अंतर्गत राज्यातील लाखो नागरिकांना विविध शासकीय योजनांचा एका छताखाली लाभ देण्यात शासन यशस्वी झाले होते. याच उपक्रमाचा विस्तार म्हणजे मुख्यमंत्री योजनादूत असून याचा मुख्य उद्देश सामाजिक बदल घडविण्यासाठी उत्सुक असलेल्या ५० हजार उत्साही तरुणांच्या समर्पित प्रयत्नाद्वारे जनतेपर्यंत पोहचणे हा आहे. कल्याणकारी योजना आणि नागरिक यांना जोडणारा उपक्रम म्हणजेच मुख्यमंत्री योजनादूत होय.

**कार्यक्रमाची रूपरेषा**

१) महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आणि मुख्यमंत्री जन-कल्याण कक्ष यांच्यामार्फत संयुक्तपणे मुख्यमंत्री योजनादूत कार्यक्रम राबविला जाणार आहे. राज्यात कार्यरत प्रशासकीय यंत्रणेला मदत करण्याकरिता मुख्यमंत्री योजनादूत नेमले जातील. २) ग्रामीण भागात प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी एक व शहरी भागात पाच हजार लोकसंख्येसाठी एक योजनादूत या प्रमाणात एकूण ५० हजार योजनादूतांची निवड करण्यात येईल. ३) मुख्यमंत्री योजनादूतास प्रत्येकी १० हजार प्रती महिना एवढे ठोक मानधन देण्यात येईल. (प्रवास खर्च, सर्व भत्ते समावेशित) ४) निवड झालेल्या मुख्यमंत्री योजनादूतासोबत सहा महिन्यांचा करार केला जाईल व हा करार कोणत्याही परिस्थितीत वाढविण्यात येणार नाही.

**उमेदवार निवड प्रक्रिया निकष**

उमेदवाराचा वयोगट १८ ते ३५ असावा. कोणत्याही शाखेचा किमान पदवीधर असावा. उमेदवाराला संगणक ज्ञान असणे आवश्यक. उमेदवाराकडे अद्ययावत मोबाईल असणे आवश्यक. उमेदवार महाराष्ट्राचा रहिवासी असणे आवश्यक. उमेदवाराचे आधार कार्ड असावे व त्याच्या नावाचे बँक खाते आधार संलग्न असावे.

**उमेदवारांनी सादर करावयाची कागदपत्रे**

विहित नमुन्यातील केलेला ऑनलाईन अर्ज. आधार कार्ड. पदवी उत्तीर्ण असल्याबाबतचे पुराव्यादाखल कागदपत्रे/प्रमाणपत्र इत्यादी. अधिवासाचा दाखला (सक्षम यंत्रणेने दिलेला). बँक खात्याचा तपशील. पासपोर्ट साईज फोटो. हमीपत्र (ऑनलाइन अर्जासोबतच्या नमुन्यामध्ये)

**उमेदवारास होणारे फायदे**

प्रत्यक्ष कामाचा अनुभव. सामाजिक बदलाचा भाग होण्याची संधी. विद्या वेतनातून युवकांना आर्थिक सहाय्य. शिकण्याबरोबरच कौशल्य विकास. सरकारी कामाचा अनुभव.

**मुख्यमंत्री योजनादूताची नेमणूक प्रक्रिया**

१) उमेदवारांच्या नोंदणीची व प्राप्त अर्जाच्या छाननीची प्रक्रिया माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाद्वारे नियुक्त करण्यात बाह्यसंस्थांमार्फत ऑनलाईनरीत्या पूर्ण करण्यात येईल. २) ऑनलाईनरीत्या प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी केल्यानंतर पात्र उमेदवारांची यादी राज्यातील प्रत्येक जिल्हा माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविण्यात येईल. जिल्हा माहिती अधिकारी हे जिल्हा सहायक आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेला प्रतिनिधी यांच्या समन्वयाने, प्राप्त अर्जाशी संबंधित उमेदवारांच्या कागदपत्रांची तपासणी करतील (यामध्ये उमेदवारांची शैक्षणिक व वयोमर्यादेविषयक मूळ कागदपत्रे तपासण्यात येतील). त्यानंतर प्रत्येक उमेदवाराबरोबर सहा महिन्याचा करार केला जाईल. कराराचा कालावधी कोणत्याही परिस्थितीत वाढविला जाणार नाही. ३) जिल्हा माहिती अधिकारी वरीलप्रमाणे शासकीय योजनांच्या माहिती संदर्भात पात्र उमेदवारांचे समुपदेशन व निर्देशन करतील. ४) जिल्हा माहिती अधिकारी हे जिल्हा सहायक आयुक्त, (कौशल्य विकास रोजगार) व जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेला प्रतिनिधी यांच्या समन्वयाने संबंधित जिल्ह्यातील ग्रामीण भागात प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी एक/शहरी भागात पाच हजार लोकसंख्येसाठी एक या प्रमाणात योजनादूत म्हणून पाठवतील.

मुख्यमंत्री योजनादूत या कार्यक्रमांतर्गत उमेदवारांना सोपविण्यात येणारे कामकाज हे शासकीय सेवा म्हणून समजण्यात येणार नाही. सबब, या नेमणूकीच्या आधारे भविष्यात शासकीय सेवेत नियुक्तीची मागणी अथवा हक्क सांगितला जाणार नाही याबाबतचे हमीपत्र निवड झालेल्या उमेदवाराकडून घेण्यात यावे.

निवड झालेल्या योजनादूताने करावयाची कामे

१) योजनादूत संबंधित जिल्हा माहिती अधिकारी यांच्या संपर्कात राहून जिल्ह्यातील योजनांची माहिती घेतील. २) प्रशिक्षित योजनादूतांनी त्यांना नेमून दिलेल्या ठिकाणी समक्ष जाऊन त्यांना ठरवून दिलेले काम पार पाडणे त्यांच्यावर बंधनकारक राहील. ३) योजनादूत राज्य शासनाच्या विविध योजनांची प्रचार आणि प्रसिद्धी करतांना ग्राम पातळीवरील यंत्रणांशी समन्वय करून शासनाच्या योजनांची घरोघरी माहिती होईल यासाठी प्रयत्न करतील. ४) योजनादूत दर दिवशी त्यांनी दिवसभर केलेल्या कामाचा विहित नमुन्यातील अहवाल तयार करुन तो ऑनलाईन अपलोड करतील. ५) योजनादूत त्यांना सोपविलेल्या जबाबदारीचा स्वतःच्या स्वार्थासाठी/नियमबाह्य कामासाठी उपयोग करणार नाहीत, तसेच ते गुन्हेगारी स्वरुपाचे/गैरवर्तन करणार नाहीत. योजनादूत तसे करत असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांच्यासोबत करण्यात आलेला करार संपुष्टात आणण्यात येवून त्यांना जबाबदारीतून मुक्त करण्यात येईल. ६) योजनादूत अनधिकृतरित्या गैरहजर राहिल्यास किंवा जबाबदारी सोडून गेल्यास त्याला मानधन अनुज्ञेय राहणार नाही.

उपसंचालक (माहिती), जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा सहायक आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेला प्रतिनिधी यांची जबाबदारी

१) विभागीय स्तरावर विभागीय संचालक/ उपसंचालक (माहिती) या योजनेचे सनियंत्रण करतील. जिल्हा माहिती अधिकाऱ्यांच्या कार्याचा आढावा विभागीय स्तरावर घेतला जाईल. २) जिल्हा माहिती अधिकारी या योजनेसाठी संबंधित जिल्ह्याचा नोडल ऑफिसर असेल. ३) संबंधित जिल्हयातील योजनादूतांनी विहित नमुन्यात ऑनलाईन अपलोड केलेल्या त्यांच्या दैनंदिन कामकाजाचा आढावा जिल्हा माहिती अधिकारी घेतील तसेच संबंधित योजनादूतांना त्यांच्या कामकाजामध्ये मार्गदर्शन करतील.

**योजनादूत कार्यक्रमाच्या संचलनासाठी बाह्यसंस्थांमार्फत करावयाची कामे**

१) उमेदवारांची ऑनलाईन नोंदणी करणे. २) उमेदवारांच्या प्राप्त अर्जाची तसेच, अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रांची छाननी करणे व पात्र उमेदवारांच्या नावांची यादी जिल्हा माहिती अधिकारी यांना ऑनलाईन उपलब्ध करुन देणे. ३) निवडण्यात आलेले योजनादूत यांना जिल्हा माहिती अधिकारी यांच्या समन्वयाने समुपदेशन व निर्देशन, कामकाजाचे वाटप इ. बाबतीत सनियंत्रण करणे. ४) योजनादूतांना कामाचे वाटप झाल्यानंतर त्यांच्या दैनंदिन उपस्थितीबाबतचा (हजेरी) ऑनलाईन पद्धतीने अहवाल घेणे. मुख्यालय स्तरावरील उपसंचालक (नोडल ऑफिसर) यांना याबाबत आवश्यक असेल तेव्हा माहिती देणे तसेच उपस्थितीबाबतचा व अन्य बाबींचा साप्ताहिक अहवाल त्यांना सादर करणे. ५) योजनादूतांनी प्रत्येक दिवशी केलेल्या कामाचा ऑनलाईन अहवाल घेणे. तद्नंतर हा अहवाल जिल्हा माहिती अधिकारी व नोडल ऑफिसर, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांना पाठविणे. ६) योजनादूतांच्या मानधनाची देयके तयार करुन जिल्हा माहिती अधिकारी यांना सादर करणे. त्याव्यतिरिक्त अन्य प्रशासकीय बाबी सादर करणे.

**अर्थसंकल्पीय तरतूद**

या कार्यक्रमाच्या अंमबजावणीसाठी ५० हजार योजनादूत यांना प्रतिमा १० हजार रुपये या प्रमाणे सहा महिन्याकरिता अंदाजे ३०० कोटी इतका खर्च येणार आहे. हा खर्च कौशल्य, रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत करण्यात येईल. योजना दूतांनी ठरवून दिलेल्या उद्दिष्ट प्रमाणे काम केले आहे का नाही याची खातरजमा माहिती जनसंपर्क विभाग करेल व त्यानंतरच योजनादुतांना मासिक मानधन अदा करण्यात येईल. ही कार्यवाही प्रत्येक महिन्याच्या २ तारखेपर्यंत पूर्ण करण्यात येईल.

**सुमारे ५० हजार योजनादूतांची भरती**

मुख्यमंत्री योजनादूत अंतर्गत माहिती व जनसंपर्क विभागाच्या वतीने राज्यभरात सुमारे ५० हजार योजनादूत पदांची सहा महिन्यासाठी भरती केली जाणार आहे. या योजनेंतर्गत प्रत्येक योजनादूतला प्रतीमहा १० हजार रुपये मानधन देण्यात येणार असून राज्याच्या कौशल्य विकास नाविन्यता रोजगार विभागाच्या वतीने हे मानधन निवड झालेल्या उमेदवाराच्या थेट बँक खात्यात जमा होणार आहे.

राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी (२७८३४), प्रत्येक नगरपालिका क्षेत्रासाठी (५३८३) एक, तर महापालिकेच्या १२९६ वार्डसाठी प्रत्येकी एक याप्रमाणे राज्यात एकूण ४७ हजार ५१६ योजनादूतांची निवड केली जाणार आहे. म्हणजे शहरी भागात १९ हजार ६८२ व ग्रामीण भागात २७ हजार ८३४ योजनादूत निवडले जाणार आहेत. याप्रमाणे राज्य शासन प्रत्येक ग्रामपंचायत व नगरपालिका क्षेत्रात मुख्यमंत्री योजनादूताची नेमणूक करून शासकीय योजनांचा प्रचार व प्रसार करणार आहे. या ५० हजार योजनादूतांना जिल्हास्तर तसेच उपविभाग स्तरावर प्रशिक्षण देण्यात येईल. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून हे योजनादूत कल्याणकारी योजना आणि नागरिक यांना जोडणारा दुवा ठरतील व पात्र लाभार्थ्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतील.

**-सुनील सोनटक्के**
**(माहिती व जनसंपर्क संचालनालय)**



## बदलते तंत्रज्ञान

# 'त्या' इन्स्टाग्राम अकाउंटवर आता पालकांचे नियंत्रण

आपल्यातील अनेकांच्या मोबाइलमध्ये इन्स्टाग्राम ॲप आहे. इन्स्टाग्राम ॲपवर रील्स पाहणे आपल्यातील अनेकांना आवडते, पण या रील्सच्या माध्यमातून अनेक चुकीच्या गोष्टीसुद्धा शेअर केल्या जातात तसेच या गोष्टी लहान मुलांच्या मनावर परिणाम करू शकतात. याचसंबंधित मेटा प्लॅटफॉर्मने एक निर्णय घेतला आहे.




मेटा प्लॅटफॉर्म नवीन टॅब उघडत आहे. सोशल मीडियाच्या नकारात्मक प्रभावांबद्दलच्या वाढत्या चिंतांचे निराकरण करण्याच्या उद्देशाने १८ वर्षांखालील मुलांच्या इन्स्टाग्राम अकाउंटसाठी प्रायव्हसी व पॅरेंटल कंट्रोलचे (पालकांचे नियंत्रण) नवीन नियम लागू केले आहेत. त्यामुळे यापुढे १८ वर्षांखालील सर्व अकाउंट हे टीन अकाउंट्समध्ये रुपांतरित (पोर्ट) केले जातील, असे सांगण्यात आले आहे.

अशा युजर्सना इन्स्टाग्रामवर ते फॉलो करत असलेल्या किंवा आधीपासून कनेक्ट केलेल्या खात्यांद्वारे मेसेज आणि टॅग केले जाऊ शकते. याशिवाय सोशल मीडियावरील सेंसेटिव्ह कंटेन्ट म्हणजे संवेदनशील कन्टेंट ही रिस्ट्रिक्टिव्ह सेटिंगमध्ये बदलली जाईल. तसेच १८ वर्षांखालील युजर्स केवळ पालकांच्या परवानगीने डीफॉल्ट सेटिंग्ज बदलू शकतात. पालकांना त्यांची मुले कोणाशी बोलत आहेत यावर लक्ष ठेवण्यासाठी, तसेच इन्स्टाग्रामचा वापर मर्यादित करण्यासाठी सेटिंग्जची एक यादीदेखील मिळेल.

१८ वर्षांखालील इन्स्टाग्राम युजर्सना दररोज ६० मिनिटांनंतर ॲप बंद करण्यासाठी सूचना दिली जाईल. अकाउंट डिफॉल्ट स्लीप मोडसहदेखील येतील, जे रात्रभर नोटिफिकेशन बंद करून ठेवले जाईल. मेटाने सांगितले की, यूएस, यूके, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि या वर्षाच्या शेवटी युरोपियमध्ये किशोरवयीन युजर्सना ६० दिवसांच्या आत अकाउंट्समध्ये ठेवतील तसेच जगभरातील किशोरांना जानेवारीमध्ये अकाउंट्स मिळणे सुरू होईल. मेटाचा हा निर्णय योग्य आहे. हल्ली तरुण पिढी, अगदी लहान मुलेही मोबाईलच्या आहारी गेली आहे. त्यांच्या सोशल मीडियावर नियंत्रण हे हवेच.

# आंतरराष्ट्रीय शांतता दिवस

दरवर्षी २१ सप्टेंबर हा आंतरराष्ट्रीय शांतता दिन म्हणून साजरा केला जातो, ज्याला जागतिक शांतता दिवस म्हणूनही ओळखले जाते. व्यक्ती, समुदाय आणि राष्ट्रांमध्ये शांतता आणि सौहार्दाचा प्रचार आणि जोपासना करणारा हा जगभरातील उत्सव आहे.

संयुक्त राष्ट्रांनी १९८१मध्ये या दिवसाची स्थापना केली आणि जगभरात अनेक कार्यक्रम आणि उपक्रमांनी तो साजरा केला जातो. प्रत्येक वर्षाच्या स्मरणोत्सवाची थीम बदलू शकते, परंतु प्राथमिक उद्देश एकच राहतो. लोकांना संघर्ष निराकरण, हिंसाचार कमी करणे आणि परस्पर समंजसपणा आणि सहकार्याचे वातावरण तयार करण्यासाठी कार्य करण्यास उद्युक्त करणे.

आंतरराष्ट्रीय शांतता दिनानिमित्त शांतता मार्च, मैफिली, संवाद, चर्चा आणि शैक्षणिक कार्यक्रम यासारख्या उपक्रमांमध्ये व्यक्ती आणि संस्था वारंवार सहभागी होतात. हा दिवस समाजांवर युद्ध आणि संघर्षाच्या परिणामांवर चिंतन करण्यासाठी तसेच शांततापूर्ण सहअस्तित्वासाठीच्या समर्पणाची पुष्टी करण्यासाठी एक वेळही प्रदान करतो.

शांततेला प्रोत्साहन देण्यासाठी जागतिक मुत्सद्देगिरीपासून तळागाळातील क्रियाकलापांपर्यंत सर्व स्तरांवर प्रयत्न करणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय शांतता दिवस या प्रयत्नांच्या महत्त्वावर जोर देण्याचा प्रयत्न करतो आणि प्रत्येकाला अधिक शांततापूर्ण




**निमित्त**

जगाला हातभार लावणाऱ्या अर्थपूर्ण उपक्रम घेण्यास उद्युक्त करतो.

जगभरात शांतता प्रस्थापित करण्यासाठी आणि प्रोत्साहन देण्यासाठी आंतरराष्ट्रीय शांतता दिवस साजरा केला जातो. हिंसाचारापेक्षा संवाद आणि समजूतदारपणाने संघर्ष सोडवण्याचे महत्त्व अधोरेखित करणे हा त्याचा मुख्य उद्देश आहे. या दिवशी लोक एकत्र येतात आणि ते अधिक शांत जगासाठी कसे योगदान देऊ शकतात यावर विचार करतात. व्यक्ती, समुदाय आणि राष्ट्रांमध्ये सुसंवाद आणि सहकार्य निर्माण करणाऱ्या प्रयत्नांना ओळखण्याची आणि त्यांना पाठिंबा देण्याची ही संधी आहे. हा दिवस आपल्या सर्वांना याची आठवण करून देतो की प्रत्येकासाठी चांगल्या आणि न्याय्य जगासाठी शांतता आवश्यक आहे.

आंतरराष्ट्रीय शांतता दिवस २०२४ची थीम शांततेची संस्कृती जोपासणे आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने जगातील सर्व भागात शांतता प्रस्थापित करण्याची योजना स्वीकारल्याला या वर्षी २५ वर्षे पूर्ण होत आहेत. आपल्या जीवनाच्या प्रत्येक पैलूमध्ये शांतता निर्माण होईल असे जग निर्माण करण्याची कल्पना आहे. याचा अर्थ दयाळूपणा, समजूतदारपणा आणि इतरांबद्दल आदर यांसारखी मूल्ये शिकवणे आणि आचरणात आणणे. यात हिंसा न करता समस्या सोडवण्यासाठी एकत्र काम करणे आणि विविध संस्कृतींमधील संभाषणांना प्रोत्साहन देणे देखील समाविष्ट आहे.

दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना झाली तेव्हा १९४५पासून आंतरराष्ट्रीय शांतता दिवस साजरा केला जातो. शांततेला प्रोत्साहन देण्यासाठी जगभरातील प्रयत्नांची तातडीची गरज लक्षात घेऊन संयुक्त राष्ट्र महासभेने २१ सप्टेंबर हा वार्षिक आंतरराष्ट्रीय शांतता दिवस म्हणून स्थापित केला.

या थीमवर लक्ष केंद्रित करून, आंतरराष्ट्रीय शांतता दिवस २०२४चे उद्दिष्ट सर्वत्र लोकांना शांतता आणि सौहार्दाचे समर्थन करणाऱ्या मार्गाने कार्य करण्यास प्रेरित करणे आहे. प्रत्येकजण शांततेने एकत्र राहू शकेल अशा जगाच्या दिशेने काम करण्याचे आवाहन आहे आणि जिथे शांततेची तत्त्वे आपल्या दैनंदिन कृती आणि परस्परसंवादाचा भाग आहेत. **(साभार : वेदांतू)**

**क्लिक...क्लिक...!**



**मुरुड : पावसाळा सरत असताना गारंबी परिसरात मोठ्या प्रमाणावर फुलपाखरे पहायला मिळतात. झाडावर, रोपांवर बसलेली ही फुलपाखरे सहजपणे लक्ष वेधून घेतात. त्यांची प्रसिद्ध छायाचित्रकार सुधीर नाझरे यांनी टिपलेली छबी.**

## आरोग्य प्रहर

# आपला टूथब्रश बदलत राहणे गरजेचे

दररोज दिवसातून दोन वेळा म्हणजेच सकाळी उठल्यावर आणि रात्री झोपण्यापूर्वी दात घासणे ही आपल्या तोंडाच्या आरोग्यासाठी चांगली सवय आहे, परंतु तुम्ही या कामासाठी योग्य साधन वापरत आहात का? टूथब्रशची परिणामकारकता त्याच्या स्थितीवर अवलंबून असते. डॉ. करिश्मा ॲस्थेटिक्सच्या कॉस्मेटिक दंतचिकित्सक डॉ. निशा ठक्कर यांनी याबाबत सल्ला दिला आहे.



डॉ. ठक्कर यांनी सांगितले की, दातांमधील प्लेक तसेच तुमच्या दात आणि हिरड्या यांच्यामध्ये अडकलेले अन्नाचे कण, त्याज्य घटक बाहेर काढता येतील अशा रीतीने टूथब्रशच्या ब्रिस्टल्सची रचना केली गेलेली असते, परंतु जीर्ण झालेले ब्रिस्टल्स दातांची व्यवस्थित साफसफाई करू शकत नाहीत. मग त्यामुळे दातांमध्ये पोकळी निर्माण होणे आणि हिरड्यांचे आजार आदी त्रास उद्भवण्याचा धोका वाढू शकतो.

टूथब्रश खराब दिसू लागणे : दोन-तीन महिन्यांपूर्वीच तुमचा टूथब्रश तुटला किंवा ब्रिस्टल्स वाकलेले दिसू लागल्यास लगेच नवीन टूथब्रश वापरण्यास सुरुवात करा, असेही डॉक्टरांनी सांगितले आहे.

आजारपणानंतर : आजारपणातून बरे झाल्यानंतर जंतूंचा प्रसार रोखण्यासाठी डॉ. ठक्कर तुम्हाला किंवा कुटुंबातील सदस्यांना टूथब्रश बदलण्याचा सल्ला देतात. असे केल्यास पुन्हा संसर्ग टाळण्यास मदत मिळते.

टूथब्रश नियमितपणे बदलण्याचे फायदे : डॉ. ठक्कर यांनी सांगितले की, टूथब्रश बदलण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करून तुम्ही तुमच्या मौखिक आरोग्याचे फायदे घेऊ शकता.

स्वच्छता : ताजे ब्रिस्टल्स प्लेक, अन्नाचे कण काढून टाकण्यासाठी चांगले असतात; ज्यामुळे तोंड स्वच्छ आणि निरोगी होते तसेच दातांमधील प्लेक काढून टाकल्याने दातांमध्ये पोकळी तयार होणे आणि हिरड्यांचे रोग होण्याला प्रतिबंध होतो.

दुर्गंधी दूर होते : तोंड स्वच्छ झाल्यास तोंडाला दुर्गंध येत नाही. अस्वच्छता निर्माण करणारे जीवाणू कमी होतात.

दिनदर्शिकेवर खूण करा : दर दोन-तीन महिन्यांनी तुमचा टूथब्रश बदलला जावा यासाठी तुम्ही दिनदर्शिकेवर टूथब्रश वापरायला सुरुवात केल्याच्या तारखेवर खूण करून ठेवा.

जास्त टूथब्रश खरेदी करा : एकाच वेळी अनेक टूथब्रश खरेदी केल्याने तुम्हाला दोन-तीन महिन्यांतून टूथब्रश एकदा बदलायचे लक्षात राहील.

# भिलवलेतील ठाकरे गटाचे कार्यकर्ते भाजपमध्ये

## ◆ आमदार महेश बालदी यांनी केले पक्षात स्वागत



**चौक : प्रतिनिधी**

भिलवले येथील उबाठा सेनेचे विद्यमान वावरले ग्रामपंचायत सदस्य मनोहर तोडकर यांच्यासह विविध पदाधिकाऱ्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केल्याने या परिसरात ठाकरे गटाला धक्का बसला आहे. आमदार महेश बालदी यांनी त्यांचे पक्षात स्वागत केले.

भारतीय जनता पक्षाच्या कार्यप्रणाली व आमदार महेश बालदी यांच्या विकास कार्यावर भाराऊन उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, तालुका अध्यक्ष प्रवीण मोरे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन ग्रुप ग्रामपंचायत वावरलेचे विद्यमान सदस्य मनोहर तोडकर यांनी आपल्या अनेक सहकाऱ्यांसह भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे. त्यांच्यासोबत आजी व माजी पदाधिकारी त्याच भिलवले ग्रामस्थ यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे.

रायगड जिल्हा परिषद माजी समाज कल्याण सभापती दामू खैर यांच्या माध्यमातून अनेक भिलवले आदिवासी वाडी व भिलवले ठाकूरवाडी येथील आदिवासी व ठाकूर समाजातील कार्यकर्त्यांनी भाजप प्रवेश केल्याने या परिसरातील ठाकरे गटाला खिंडार पडले आहे. भिलवले येथे लाखो रुपयांची विकास कामे आमदार महेश बालदी यांनी केली आहेत. ग्रुप ग्रामपंचायत वावरले हद्दीतील अनेक गावांना नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी निधीची तरतूद केल्याने या परिसरातील अनेकांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे.

या वेळी माजी तालुका अध्यक्ष रामदास ठोंबरे, बूथ प्रमुख सचिन ठोंबरे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. या सर्वांचे स्वागत आमदार महेश बालदि यांनी करून विकास कामांना प्राधान्य देऊन सर्वांचा पक्षात आदर राहील, असे सांगितले.

दरम्यान, भाजपच्या कार्यप्रणालीला आकर्षित होऊ विविध पक्षांतील कार्यकर्ते पदाधिकारी भाजपचा झेंडा हाती घेत आहेत.

# रक्तदान म्हणजे सामाजिक दायित्व -अश्विनी पाटील



**खोपोली : प्रतिनिधी**

रक्तदान म्हणजे सामाजिक दायित्व, यासाठी सर्वांनी विशेषता तरुणांनी याकरिता जनजागृती करावी व पुढाकार घ्यावा, असे आवाहन भाजप महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील यांनी केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी व मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधक भाजप खोपोली मंडळातर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते, या वेळी त्या बोलत होत्या.

या शिबिराला शहर अध्यक्ष रमेश रेटरेकर, सरचिटणीस राहुल जाधव, अजय इंगुलकर, युवा मोर्चा निकेत पाटील, महिला मोर्चाच्या अश्विनी अत्रे, सुप्रिया नांदे, अपर्णा साठे, विभावरी पाठक, स्नेहल सावंत, अनिता शहा, रसिका शेटे, विमल गुप्ते, सुनिती महर्षी, सीमा मोगरे, वैद्यकीय सेलचे विकास खुरपडे, दिलीप पवार, संजय म्हात्रे, सूर्यकांत देशमुख, विनायक मांडपे, अनिल कर्णूक, संजय कचरे हेमंत भाटिया,मोरे, सह अनेक कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते.

# रायगड जिल्ह्यात चाणक्य कौशल्य विकास केंद्र सुरू

## खासदार धैर्यशील पाटील यांच्या हस्ते उद्घाटन



**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील चाणक्य कौशल्य विकास केंद्राचे उदघाटन पॉलिटेक्निक महाविद्यालय पेण येथे राज्यसभा खासदार धैर्यशील पाटील यांच्या हस्ते व रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या उपस्थित झाले.

राज्यातील एक हजार चाणक्य कौशल्य विकास केंद्राचे ऑनलाईन उदघाटन देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते व राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार,कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या प्रमुख उपस्थित वर्धा येथे झाले. त्याचे थेट प्रक्षेपण जिल्ह्यातील २६ महाविद्यालयात आयोजित करण्यात आले होते.

पेण येथे आयोजित या कार्यक्रमांस सहाय्यक आयुक्त जिल्हा कौशल्य विकास,अमिता पवार, प्रांतधिकारी प्रवीण पवार, तहसीलदार तानाजी शेजाळ, महाविद्यालय प्राचार्य, स्टाफ व विधार्थी उपस्थित होते.

रायगड जिल्ह्यात एकूण २६ ठिकाणी ही केंद्र कार्यरत असणार आहेत. आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रामधून उमेदवारांना मोफत कौशल्य प्रशिक्षण उपलब्ध होणार आहे.नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२०मध्ये व्यावसायिक शिक्षणाला महत्त्व देण्यात आलेले आहे. त्या धोरणाच्या अमंलबजावणीला सकारात्मक वातावरण निर्मिती होण्यासाठी तसेच युवक युवतींना कौशल्य विकासाची संधी महाविद्यालयामध्ये उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र ही नाविन्यपूर्ण योजना सुरू केली आहे.

महाविद्यालयात कौशल्य विकास केंद्र स्थापन करून १५ ते ४५ वयोगटातील युवक-युवतींना कौशल्य विकास प्रशिक्षण प्रदान करून त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी संधी उपलब्ध होणार आहेत.

# खालापूर भाजपतर्फे रक्तदान शिबिर

## मंत्री रवींद्र चव्हाणांच्या वाढदिवसानिमित्त उपकम्र

**चौक : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री आणि रायगडचे माजी पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पक्ष खालापूर तालुक्याच्या वतीने रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते.

महाराष्ट्र राज्य सरकारमधील वजनदार आणि कार्य कुशल सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त खालापूर तालुका भारतीय जनता पक्षाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात चौक सरपंच रितू ठोंबरे यांनी रक्तदान करून शिबिराचे उद्घाटन केले. रायगड हॉस्पिटल आणि ब्लड बँक कर्जत यांच्या सहकार्याने चौक येथील जेष्ठ नागरिक सभागृहात रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते.

या वेळी उत्तर रायगड भारतीय जनता पक्षाचे उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, खालापूर तालुका अध्यक्ष प्रवीण मोरे, सरपंच रितू ठोंबरे, चौक शहर अध्यक्ष गणेश कदम, माजी तालुका अध्यक्ष रामदास ठोंबरे, गणेश मुकादम, दर्शन पोलेकर, तुपगाव सरपंच रवींद्र कुंभार यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

**(छाया : अर्जुन कदम)**



# वाहन नोंदणी क्रमांकासाठी आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल येथे VAHAN ४.० या संगणक प्रणालीवर परिवहन संवर्गातील मालवाहू वाहनांसाठी (Transport Vehicle) सध्या सुरू असेलेली MIH-46-CL मालिका संपल्यानंतर तत्काळ नवीन मालिका MII-46-CU सुरू करण्यात येणार आहे.

अटींच्या अधिन राहून आकर्षक व पसंतीच्या वाहन नोंदणी क्रमांकासाठी अर्ज (विहीत शुल्काच्या धनाकर्यासह D.D.) दि. २५ सप्टेंबर रोजी दुपारी २ वाजेपर्यंत स्विकारून पसंतीचे व आकर्षक क्रमांक विहीत शुल्क आकारून आरक्षित करण्यात येतील.

एका पसंतीच्या / आकर्षक क्रमांकासाठी एकापेक्षा अधिक अर्ज प्राप्त झाल्यास त्यांचेकडून २५ सप्टेंबर रोजी अतिरिक्त रकमेचे धनाकर्ष (D.D.) दुपारी १ वाजेपर्यंत सीलबंद लिफाप्यात स्विकारले जातील. त्याच दिवशी दुपारी ४ वाजता सदर सीलबंद लिफापे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे दालनात उपस्थित अर्जदारांसमक्ष उघडण्यात येतील. विहीत नियमांनुसार पसंतीचे / आकर्षक क्रमांक आरक्षित करण्यात येतील.


**महाराष्ट्र शासन**

**जिल्हा शासकीय रूग्णालय, रायगड-अलिबाग अलिबाग-४०२ २०१.**

Emal ID: csraigad70@gmail.com

**ई-निविदा सुचना**

जिल्हा शल्यचिकित्सक, रायगड अलिबाग हे जिल्हा रुग्णालय अलिबाग अधिपत्याखालील उपजिल्हा मूगणालय, पनवेल, माणगाव येथे Oral Assesment syetem यंत्रसामुग्री व साहित्यसामुग्री खंग्दीची ई निविदा मागविणेबाबतची जाहिरात वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यांकरिता यासोबत जोडण्यांत येत आहे. प्रग्नुन निविदेचे वेळापत्रक खालील प्रमाणे राहील.

| अ.क्र. | तपशिल | दिनांक व कालावधी |
|---|---|---|
| १ | ई-निवीदा सादर करण्याचा कालावधी | दि.२०.०९.२०२४ रोजी सकाळी १०.०० ते दि.०४.१०.२०२४ साय. ५.०० पर्यंत उपलब्ध राहील. |
| २ | ई- निवीदा सादर करण्याचा अंतीम दिनांक व वेळ | दि.०४.१०.२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत. |
| ३ | निवीदा पुर्व सभा | २४.९.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता |
| ४ | ई-निवीदा उघडण्याचा दिनांक वेळ व ठिकाण | ०७.१०.२०२४ सकाळी ११.०० वाजता |

प्रस्तुत जिल्हा रुग्णालय अलिबाग व उपजिल्हा रुग्णालय पनवेल, माणगाव येथील रुग्णालयाकरीता यंत्रसामुग्री व माहित्यसामुग्री पुरवठा करण्यास इच्छुक असलेल्या ठेकेदार / निविदा धारकांना निविदेतील अटि व शर्ती , निविदा संदर्भात वेळापत्रक इ. माहीती ई-निविदा प्रणालीव्दारे रू. १८०००/- (ना परतावा) भरल्यावर महाराष्ट्र शासनाच्या Website :- https://mahatenders.gov.in वर उपलब्ध होतील. प्रस्तुत निविदा मान्य करण्यांचा अथवा कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा अमान्य करण्यांचा अधिकार खाली स्वाक्षरी करणा-या अधिका-याने राखून ठेवला आहे.

**सही/-**

**जिल्हा शल्यचिकित्सक, रायगड अलिबाग**


# देवन्हावे येथे भाजपतर्फे रक्तदान शिबिर



**खोपोली :** भाजप खालापूरच्या वतीने जिल्हा उपाध्यक्ष सनी यादव यांनी मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर घेण्यात आले. या वेळी २६ जणांनी रक्तदान केले.

शिबिरास जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस दीपक बेहरे, माजी जि.प. सभापती नरेश पाटील, जिल्हा किसान मोर्चा अध्यक्ष अतुल बडगुजर, युवा मोर्चा विधानसभा प्रमुख प्रसाद पाटील, तालुका अध्यक्ष नागेश पाटील, रवींद्र पाटील, जगदीश आगीवले, मयूर पाटील, महेश कडू, अनिल जाधव, हरिभाऊ जाधव, विकास रसाळ, भरत महाडिक, लवेश कर्णूक, ज्ञानेश्वर पारंगे, दत्ताराम पाटील, अरुण घोंगे, संदीप मोरे, मुनीर धनसे, राकेश म्हामुणकर, प्राणेश देशमुख, मनीष पाटील, मिलिंद दाभोळकर, नवनाथ हाडप आदी उपस्थित होते.

# ज्ञानेश्वरी जयंतीनिमित्त कीर्तनमाला

**अलिबाग : प्रतिनिधी**

विश्व हिंदू परिषदेतर्फे ज्ञानेश्वरी जयंती सोमवार (दि.२३)पासून तीन दिवस अलिबाग-रामनाथ येथील प्राचीन राम मंदिरात सुश्राव्य कीर्तनमालेचे आयोजन करण्यात आले आहे.

लोकजागृती आणि प्रबोधन उद्देशाने, ज्ञानेश्वरी जयंतीच्या निमित्ताने महाराष्ट्रभरात कीर्तन, प्रवचन, दिंड्या, आणि भजन असे विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित केले जातात व समाजातील विविध प्रश्नांवर जागृती व प्रबोधन केले जाते. या वर्षी ज्ञानेश्वरी जयंतीच्या औचित्याने २३ ते २५ सप्टेंबर या दरम्यान रोज संध्याकाळी ६ ते ८ या वेळेत सुश्राव्य कीर्तनांचे आयोजन केले आहे.

कीर्तनमालेला भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन विश्व हिंदू परिषद, अलिबाग यांचेतर्फे करण्यात आले आहे.


**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

मुदतवाढ सूचना

**ई निविदा सूचना क्र. २७/२०२४-२०२५ (मुंबई) करीता**

दिनांक २२/०८/२०२४ रोजी दैनिक नवाकाळ, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक नवभारत, मुंबई, दैनिक खबरें आजतक, मुंबई, दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामाकरीता कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण / महामंडळाचा खुलास व ई निविदा संकेतस्थळावर उपलब्धतेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | अलिबाग विभागासाठीच्या पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.... नागोठणे जॅकवेल ते आरसीएफ कंपनी दरम्यानच्या सेवा रस्त्यावरील पुलांचे मजबुतीकरण व दुरुस्ती एफआरसीएम प्रक्रिये सह करणे. | ₹ १९,१९,३०,१०५.०० |

आता उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक २४/०९/२०२४ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

ज्या निविदा धारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification.

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No :- 7000033412** **Tender No.: EE/400kV/RS(O&M)/DN/KHR/Ten-12/24-25** SRM Tender for Repairing of 33kV Current Transformers (CTs) / Potential Transformers (PTs) at 400kV RS, Kharghar. |
| 2 | Online Downloading the RFx | **19.09.2024, 18:00 Hrs. to 26.09.2024, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the | **On or Before 26.09.2024 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **27.09.2024. at 11:00 hrs.(if Possible)** |
| 5 | Tender amount | **Rs 5,68,440 /-** |
| 6 | EMD amount | **1% of Estimated cost** |
| 7 | Tender fees | **Rs 500/- + GST** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**

**Contact Person :-** 1.The Executive Engineer, : Mobile No. 8275215120.
2. Dy. Executive Engineer (O),: Mobile No 9769213899

**Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM ETenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER , 400KV RS (O&M) DN KHARGHAR**



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tender -25 **(RFX.7000031554)** | Rfx e-tender for work of monkey patrolling with top video shooting of 220kV & 100kV Critical lines under EHV Lines S/Dn Panvel under EHV (O&M) Division Panvel. ….**2nd call.** **(Tender Fee Rs. 500/- + 18% GST)** | **Limited to Rs.25,00,000/-** |
| Tender -27 **(RFX.7000031714)** | RFx e-tender for AMC for work of repairs of 220kV Isolator, 100kV Isolator and 22kV Isolator and cable termination and joints at various substation under EHV (O&M) Division Panvel… **2nd call.** **(Tender Fee Rs. 500/- + 18% GST)** | **Limited to Rs.15,00,000/-** |

EMD 1% of estimated cost for each Tender. **Submission of bids from 20.09.2024 to 26.09.2024 up to 23:59 hrs, Opening date:-27.09.2024 @ 11:00 Hrs.** For further details visit our website https://srmetender.mahatransco.in/ Contact Person: The ADDL. Executive Engineer (O) Tel No. 022-27465410, Mob. No. 8530095666 E-mail ID ee7210@mahatransco.in

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER, EHV(O&M) DN PANVEL**

# रायगडात गिधाड संशोधन केंद्र उभे करायचेय -प्रेमसागर मेस्त्री

**पक्षी निरीक्षणाचा छंद आपल्यापैकी बऱ्याच जणांना असतो, मात्र पक्षी संवर्धनाच्या माध्यमातून कोकणातील रायगड जिल्ह्यातून पक्ष्याची एक प्रजात नामशेष होण्यापासून वाचवणारे. निसर्गाचे स्वच्छतादूत असलेल्या गिधाडाचे रक्षक म्हणजे प्रेमसागर मेस्त्री. रायगड जिल्ह्यातून गिधाडांची कमी होणारी संख्या निदर्शनास आल्यावर मोठ्या ध्यासाने त्यांनी या पक्ष्याच्या संवर्धनाला सुरुवात केली. स्थानिकांमध्ये या पक्ष्याविषयी जनजागृती केली. सिस्केप महाड (सोसायटी ऑफ इको एनडेंजर्ड स्पेसिज कंझर्वेशन अँड प्रोटेक्शन) संस्थेच्या सायंटिफिक रिसर्च टीममधील सदस्य सिस्केप गिधाड संशोधन आणि संवर्धन केंद्राच्या माध्यमातून रायगड जिल्ह्यातील गेली तीन दशके चालणाऱ्या गिधाडांचे संवर्धन करणारे निसर्गप्रेमी, संशोधक प्रेमसागर मेस्त्री यांच्याबरोबर संवाद साधला आहे.**





राम प्रहर संवादप्रहर

**▶ प्रेमसागरजी, वाईल्ड लाईफ वार्डन म्हणून शासनाने आपली नेमणूक केली आहे, म्हणजे नेमके काय आहे?**

रायगड जिल्हा तसेच प्रत्येक जिल्ह्यात वन खात्यात वन अधिकाऱ्याची नेमणूक असते. त्यांचे काम असते वना (जंगला) बरोबरच वन्य जीवनाचे रक्षण करणे. त्याचा आढावा घेऊन त्यांचे पुनर्वसन करणे. आपल्याकडे अधिकारी कमी आणि एरिया जास्त असतो. वन विभाग आणि समाजातील निर्माण होणारी दरी कमी करण्यासाठी शासनाने रायगड जिल्ह्यात तीन वाईल्ड लाईफ वार्डनची नेमणूक केली आहे. त्यामध्ये मी एक आहे.

**▶ आपण शिक्षकी पेक्षाकडून वन्यजीव संरक्षणाकडे कसे वळलात?**

भारतातील प्रत्येक राज्यात जाऊन तळागाळातील लोकांपर्यंत जाता यावे. तेथील वन्य जीवांची माहिती गोळा करावी. त्यातून काही शिकावे यासाठी मी शिक्षकी पेक्षा स्वीकारला होता, कारण हे सगळे काम ग्रामीण भागातील आहे. आपल्याकडे ग्रामीण भागातच जंगल टिकून आहे. महाडला टिपणीसांच्या वाड्यात राहत असताना सुट्टीत त्यांची मुले मुंबई पुण्याहून यायची त्यामध्ये रूपा दवणे तिला आम्ही रूपादीदी म्हणतो ती डेहराडूनमध्ये वाईल्ड लाईफमध्ये एमएससी करीत होती. ती आम्हाला जंगलात पक्षी बघायला घेऊन जायची. त्यामुळे मला पक्षांची नावाने ओळख झाली. मला त्याची आवड निर्माण झाली आणि मी या क्षेत्रात शिक्षण घेण्याचे ठरवून एमएससी केले. बीएड करून मी पहिल्यांदा माणगाव तालुक्यातील वडघर मुद्रे येथील शाळेत लागलो. तो सन ९१-९२चा काळ होता तेथील वनसंपदा बघायला मिळाली. याशिवाय पक्षी निरीक्षण करताना हॉर्न बिल, गरूड व गिधाडे याविषयीचे ज्ञान प्रगल्भ होत गेले. नातर गुजरात, मध्यप्रदेश, हिमाचल, उत्तर प्रदेश आशा विविध राज्यात नोकरी केली. तेथील वन्यजीवांचा अभ्यास केला.

**▶ तुम्ही वन्यजीवांची माहिती घेण्यासाठी वेगवेगळ्या राज्यात शिक्षकाची नोकरी केलीत?**

हो, कारण तुम्हाला समोर मुले मिळतात. त्यांना आवड निर्माण होईल असे शिकवले की ते आपले मित्रच नाही बनत तर संवर्धनाचेही काम करतात अशा तर्हेने साधारण ३०-४० गावातील मुले भेटतात. त्यामुळे १० स्के. किमीचे नेटवर्क तयार होते. मध्यप्रदेशमधील रेवा जिल्ह्यातील असाच एक माझा विद्यार्थी येथे स्वयंसेवक म्हणून आला होता. आता तो पुन्हा तेथे गिधाडांचे काम करण्यासाठी गेला आहे. महाडचा प्रणव कुळकर्णी आमच्याबरोबर काम करायचा आज तो डोलफीनवर संशोधन करीत आहे. परदेशात ही जाऊन आला आहे. डब्ल्यूडब्ल्यूएफसारखी संस्था त्याला आपल्या कामात बरोबर घेते. वन्य जिवांचे काम करताना मर्यादा आहेत, पण ते विद्यार्थ्यात रुजवले तर ते पुढे सुरू राहील.

**▶ रायगड जिल्ह्यात गिधाडांचा संवर्धनाचा प्रयोग करावा, असे का वाटले?**

सह्याद्री निसर्ग संस्थेचे विकास काटदरे (भाऊ) यांच्यामुळे मी कोकणातील पक्षी संवर्धनामध्ये आलो. त्यांनी मला गिधाडे आणि हॉर्न बिलच्या प्रोजेक्ट्साठी बोलावले. त्यामध्ये मी सहभागी झालो. महाडमधील काम मी बघत होतो. त्यात मला खूप अनुभव मिळाला. चिपळूणला पक्षी संमेलन झाले. त्यामध्ये आजूबाजूच्या पक्षांचा डेटा सादर करावा लागतो. तो तयार करताना स्थानिक आणि स्थलांतरीत अशी माहिती द्यावी लागते. या वेळी आम्ही येणाऱ्या पाहुण्यांना गिधाडांची घरटी दाखवली. त्यानंतर १९९९मध्ये टाइम्स ऑफ इंडियाने भारतातील ९९ टक्के गिधाडे संपल्याची बातमी वाचली, मग आम्ही शोधायला सुरुवात के तेव्हा लक्षात आले की खरेच गिधाडे कमी झाली आहेत. १९९९ साली 'सोसायटी ऑफ इको-एन्डेन्झर्ड स्पिसीज कॉन्झर्वेशन ॲण्ड प्रोटेक्शन' (सिस्केप) या स्वयंसेवी संस्थेची स्थापना केली. या माध्यमातून म्हसळा, श्रीवर्धन, चिरगाव या तालुक्यात सर्वेक्षण केले. सर्वेक्षणाअंती अपुरे अन्न आणि अधिवास नष्टतेमुळे गिधाडांची संख्या कमी झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांना या भागामध्ये केवळ २२ गिधाडे आणि त्यांची घरटी आढळून आली. भारतात प्रामुख्याने राजस्थान, मध्य प्रदेश, गुजरात, हिमालय, कर्नाटक आणि महाराष्ट्रात आढळणाऱ्या गिधाडांच्या नऊ प्रजाती आज नामशेष होण्याच्या उंबरठ्यावर आहेत. हे प्राण्यांच्या शवांमध्ये आढळणाऱ्या डायक्लोफेनाक औषधामुळे जलद अधिवास नष्ट होणे आणि विषबाधा झाल्यामुळे होत आहे, इतर वेळी हे पक्षी उपासमारीने मरतात, त्यामुळे त्यांनी गिधाडांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करून त्यांच्या संवर्धनाचे काम सुरू केले.

**▶ त्यासाठी तुम्ही नेमके काय केले?**

गिधाड संवर्धनाच्या कामाला सुरुवात केल्यानंतर पुढल्या पाच वर्षांमध्ये गिधाडांच्या अधिवास क्षेत्रात गावकऱ्यांच्या मदतीने सुमारे ५० हजार वृक्षांचे रोपण केले. संवर्धन कार्यात स्थानिकांची मदत मिळवण्यासाठी त्यांना गिधाडांचे महत्त्व आणि संरक्षणाची गरज समजवण्यात आली. सोबतच देवरायांचा शोध घेऊन गिधाडांना राहण्यायोग्य अधिवास निर्माण करता येऊ शकेल का, यासाठी प्रयत्न करण्यात आला. अधिवासाचे पुनर्संचयन करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. वडघर, नाणेमाची, खामगाव, चीरगाव आणि आसपास भागामध्ये गिधाड संवर्धन कार्याचा विस्तार करण्यात आला. चिरगाव, खामगाव, गोवले आणि कुमशेत भागातील हरित क्षेत्रांना राखीव वनांचा दर्जा मिळवून देण्यासाठी वन विभागाकडे पाठपुरावा केला. या सगळ्या कामांमुळे हरित क्षेत्राचे संवर्धन झाले. ज्यामुळे ३४ देवराया संरक्षित झाल्या आणि त्यामध्ये गिधाड, धनेश आणि घुबडांचा अधिवास निर्माण झाला. महाराष्ट्रातील कोकण विभागातील चिरगाव या गावात दोन गिधाडांच्या प्रजाती, व्हाइट-रम्पड गिधाड आणि लाँग-बिल्ड गिधाड, अनेकदा सूर्यप्रकाशात आनंदाने बासिंग करताना, त्यांचे पंख पसरवण्यासाठी, त्यांचे शरीर स्वच्छ करताना आणि त्यांच्या पिलांना खायला घालताना दिसतात.

**▶ गिधाड प्रजातींच्या संख्येत इतक्या मोठ्या प्रमाणात घट होण्याचे कारण काय आहे?**

मुख्य कारणे म्हणजे वस्तीचे नुकसान आणि उपासमार. जंगलतोडीमुळे जुनी उंच झाडे गायब झाली होती आणि त्यांची जागा शहरी लोकसंख्येने सुट्टीसाठी घरे म्हणून बांधलेल्या फार्म हाऊसने घेतली होती. ही फार्महाऊस सुमारे ५० एकर आणि कधी १०० एकरांवर पसरलेली होती. मोठ्या प्रमाणात काजू आणि आंब्याच्या लागवडीमुळे किंवा शेतजमिनीमुळे अधिवासाची हानी आणखी वाढली. अधिवास नष्ट झाल्यामुळे अन्नाचा तुटवडा निर्माण झाला. गिधाडे मेलेल्या प्राण्यांना खातात, अशा प्रकारे पर्यावरणाचे नैसर्गिक शुद्ध करणारे म्हणूनते काम करतात. तथापि, स्वच्छ गावांबद्दलची राज्य सरकारची धोरणे आणि मोहिमेमुळे या मृत प्राण्यांना निसर्गाच्या दयेवर एकटे सोडण्याऐवजी पुरणे किंवा त्यांची विल्हेवाट लावणे भाग पडते. गिधाडे वर्षातून एकदा प्रजनन करतात आणि एक पिल्लू देतात. जर पिल्ले जगू शकले नाहीत किंवा अन्न किंवा निवासस्थानाच्या अभावामुळे मरतात, तर एक पिढी नष्ट होते. या जैविक घटकामुळेवाढीलाही अडथळा निर्माण होतो. प्राण्यांच्या शवांमध्ये आढळणारे डायक्लोफेनाक औषध हे गिधाडांच्या मृत्यूचे सामान्य कारण आहे. रोगांवर उपचार करताना हे औषध सहसा प्राण्यांना दिले जाते.

**▶ भारतात किती प्रकारची गिधाडे आहेत?**

जगात गिधाडांच्या तेवीस प्रजाती आहेत; भारतात त्यापैकी नऊ आहेत. भारतात, ओरिएंटल व्हाईट बॅक, लाँग-बिल, स्लेन्डर-बिल, हिमालयन, रेड-हेडेड, इजिप्शियन, दाढीवाले, सिनेरियस आणि युरेशियन ग्रिफॉन अशा नऊ प्रजाती आहेत. याशिवाय राज गिधाड. पूर्वी असे सांगतात आपण मेलेली गुरे टाकली की, तेथे गिधाडे यायची, पण थांबून राहायची ज्यावेळी हे राज गिधाड येऊन त्याने डोळा फोडला किवा मानेला चोच मारली की मग सगळी गिधाडे खायची. आशा गोष्टी खेडे गावात ऐकायला मिळतात. महाराष्ट्रात रायगड मध्ये पांढऱ्या पाठीचे गिधाड व लाल चोचीचे कड्यातील गिधाड सापडतात.

**▶ गिधाडे दिवसभरात खाद्य शोधण्यासाठी किती अंतर आणि कोठे जातात?**

चिरगावची गिधाडे चांदोरे, तळा, रायगड ते पालीपर्यंत अन्नाच्या शोधत जाऊन संध्याकाळी परत येतात. ती हवेतील उष्णतेच्या झोताचा वापर करून उंच जातात. त्यामुळे कमीत कमी शक्ती वापरून वरील परिसरात १५ मिनिटात पोहचतात. १३ वर्षे आम्ही त्यांचे संशोधन केले आहे. त्यांच्या खाद्यासाठी आम्ही तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांकडून खास परवानगी घेऊन गावात गुरे मेली की त्यांना त्याठिकाणी नेण्याची स्वत:च्या खर्चाने व्यवस्था केली. त्यात अनेक अडचणी आल्या, पण आम्ही त्यातून मार्ग काढला. सुरूवातीला आम्ही गुरे तेथे नेऊन टाकली तरी ते खात नसत. मग एका गावकऱ्याने सांगितले की, त्याची कातडी कापा तुम्हाला माहीत नाही वाटते. पूर्वी चर्मकार समाज जनावरांची कातडी काढून घेऊन मग जनावर टाकत असत, मग आम्ही तसे केल्यावर ती खायला लागली, मग त्यांची तेथे घरटी वाढू लागली.

**▶ रायगड जिल्ह्यागिधाडांची आज किती संख्या आहे?**

गिधाड वर्षाला एकाच अंडे टाकते. वर्षात एकाच पिल्लू होते. ते पिल्लू जन्माला आल्यावर घरट्यात साडे तीन महीने राहते, मग घरट्याच्या आजूबाजूच्या परिसरात दोन ते चार महिने त्याला आई-बाबा अन्न देतात. त्यांचे रक्षण करतात. त्यांच्यात सामाजिक बांधणी खूप चांगली आहे. आई-बाबा त्यांना उडायला शिकवत नाहीत ती टिम वेगळी आहे. वरती जातात पण वरती कशा पध्दतीने गेले पाहिजे हवेच्या झोत कसे शोधायचे त्यांचा कसा वापर करायचा. अन्नाचा शोध कसा घ्यायचा हे शिकवण्याचे काम ज्येष्ठ गिधाडे करतात. इतर गिधाडे अन्नाच्या शोधत जातात तेव्हा २-३ गिधाडे त्या घरट्यांच्या रक्षणासाठी तेथे असतात. २० वर्षांपासून घेतलेल्या अथक परिश्रमांमुळे परिसरात गिधाडांची संख्या २२ वरून ३४७ पर्यंत वाढली आहे.

**▶ गिधाड संवर्धनासाठी शासनाकडून काय मदत मिळते?**

शासनाने चांगले अनुदान मंजूर केले आहे, पण दुर्दैवाने ते आमच्यापर्यंत येत नाही. मी परदेशात जातो तेव्हा मिळालेल्या माहिती प्रमाणे ३४ देशातून गिधाडांसाठी आपल्या देशाला अनुदान मिळते. गिधाडांसाठी केंद्रीय पर्यावरण विभागाकडे २२७ कोट्यवधी रुपयांचे अनुदान आले आहे. त्यामध्ये सर्वेक्षणासाठी ५० लाख, संशोधांनासाठी दीड कोटी रुपये, अन्न वाहतुकीसाठी ५० लाख असे आकडे असून ही आपल्या राज्यात ते आले नाहीत. नामदार आदिती तटकरे यांनी प्रत्यक्ष फील्डवर येऊन पक्षांचे निरीक्षण केले. त्यानंतर अनेक अडचणी असून ही विशेष संरक्षण दर्जा चिरगावच्या जंगलाला मिळवून दिला हे विशेष. भविष्यात त्यांच्याकडे परिवारण खाते आल्यास त्याचा निश्चितच फायदा होऊ शकेल. आम्ही लवकरच खासदार सुनील तटकरे यांचेकडे प्रस्ताव सादर करणार आहोत. आमदार भरत गोगावले यांनी ही मुख्यमंत्र्यांनी स्वत: गिधाड यासाठी विशेष अनुदान देऊन सामाजिक संस्थांना बरोबर घेऊन काम करावे असे सांगितले असल्याचे सांगितले.

**▶ रायगडात गिधाडांसाठी विशेष काय करण्याचा विचार आहे?**

महाडमधील चांदोरे येथे गिधाड संशोधन केंद्र उभे करायचे आहे. चिरगाव येथे आभ्यास केंद्र चालवतो. भेकरचा कोंड येथे रेस्क्यू सेंटर करायचे आहे. कारण चिरगाव आणि श्रीवर्धनमधील गिधाडे अनेक वेळा पडत असतात. चिरगाव व वडघर पांगळोली येथे वन विभागाची जमीन आहे तेथे गावाला हा प्रकल्प हवा आहे. त्यामुळे मी गेलो तरी तो प्रकल्प सुरू राहील म्हणून तेथे प्रकल्प सुरू करावा. महाडमधील नाणेमाची येथे संशोधन केंद्र उभारावे. रायगडमध्ये राजमाता जिजाऊ राष्ट्रीय अभाराण्य उभारावे, अशी इच्छा आहे. **(शब्दांकन : नितीन देशमुख)**

## पनवेल तक्का येथे ईदनिमित्त जुलूस

### मान्यवरांचा सत्कार; नागरिकांना सरबत वाटप





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ईद-ए-मिलादनिमित्ताने जुलूस अर्थात मिरवणूक काढण्यात येते. या वर्षी ईदच्या दिवशी गणेशोत्सवातील नववा दिवस होता. त्यामुळे पनवेल परिसरातील तक्का येथील हजरत पीर जमाल शहा तरजरी कुददुस दर्गा समितीतर्फे दोन्ही समाजांमध्ये सलोखा राहावा यासाठी बुधवारी जुलूस काढण्यात आला.

पीर जमाल शहा बाबा दर्गाह येथून जुलूस काढण्यात आला. या दरम्यान दर्गाह ट्रस्टचे मुख्य विश्वस्त जावेद इब्राहिम फकीर मुजावर, सिजान जावेद मुजावर, इमाम अल्लामा मौलाना नईम यांचा माजी नगरसेवक अजय बहिरा आणि युवा कार्यकर्ते आफताब ताडे यांनी सत्कार केला. सोबत हारून शेख, काशिफ शेख, इलियास शेख, जुनेद ताडे, सरफराज शेख, फहद ताडे, मुशरीफ ताडे, शादाब ताडे, निजाम सैय्यद आदी कार्यकर्ते उपस्थित होते. या वेळी जुलूसमध्ये सहभागी नागरिकांना सरबताचे वाटप करण्यात आले.

## प्रशासकीय भवनातील न्यायप्रविष्ट जागा महसूल विभागाच्या ताब्यात

**खारघर : प्रतिनिधी**

पनवेल तालुका प्रशासकीय भवनाच्या न्यायप्रविष्ट जागेचा निकाल नुकताच लागल्याने ती जागा पनवेलचे तहसीलदार विजय पाटील यांनी महसूल विभागाच्या ताब्यात घेतली.

बचतधाम मधील तीन गाळेधारकांनी १० वर्षांपूर्वी पनवेलच्या तहसीलदाराविरोधात दिवाणी न्यायालयात शासकीय जागेतील भाडेकरू असल्याचा दावा करून ते गाळे ताब्यात राहण्यासाठी दावा केला होता. दोन आठवड्यांपूर्वी पनवेल जिल्हा दिवाणी न्यायालयाने त्या तीन गाळेधारकांचा दावा ना मंजूर केला होता. पनवेल जिल्हा न्यायालयाच्या आदेशानुसार सर्व कायदेशील प्रक्रिया पार पाडून पनवेल तहसीलदार विजय पाटील यांनी त्या तीन गाळ्यांचा ताबा घेण्याची कायदेशील प्रक्रिया पूर्ण केली त्यामुळे प्रशासकीय भवनाचे रखडलेले अंतिम टप्यातील काम पूर्ण होणार आहे.

हा ताबा घेतेवेळी पनवेल पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक प्रविण ठाकरे, निवासी नायब तहसीलदार संजय भालेराव, पनवेल मंडळ अधिकारी गोवर्धन माने, तळोजा मंडळ अधिकारी एच. एन. सरगर, अव्वल कारकून सुभाष राठोड तसेच संबंधित तलाठी उपस्थित होते. प्रक्रिया कोणतीही कायदा, सुव्यवस्थतेचा प्रश्न निर्माण न होता शांततेत झाली.

## आज पनवेल टाइम्स सन्मान पुरस्कार सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**


गणेश कोळी संपादित पनवेल टाइम्सच्या वर्धापन दिनानिमित्त शनिवारी (दि. २१) पनवेल टाइम्स सन्मान पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यास मान्यवरांची उपस्थिती असणार आहे.

पनवेलचे नाव उंचवणाऱ्या व्यक्ती आणि सेवाव्रती संस्थांना मान्यवरांचे हस्ते गौरविण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे वर्धापन दिनानिमित्त घेण्यात आलेल्या माझ्या स्वप्नातील पनवेल..या निबंध स्पर्धेच्या विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देण्यात येणार आहेत.

या समारंभासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, खगोल अभ्यासक-पंचांगकर्ते दा.कृ.सोमण, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेंद्र दळवी, कामगार नेते महेंद्र घरत, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, ज्येष्ठ साहित्यिक रायगडभूषण प्रा.एल.बी.पाटील, प्रसिध्द अभिनेत्री मुग्धा गोडबोले उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन संपादक गणेश कोळी यांनी केले आहे.

## डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील जयंती सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



रयत शिक्षण संस्थेचे पनवेल येथील महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पनवेल येथे महाराष्ट्राचे शिक्षण महर्षी व रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांचा १३७ वा जयंती सोहळा मंगळवारी (दि. २४) सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला आहे.

या सोहळ्यास अध्यक्ष म्हणून रयत शिक्षण संस्थेचे मैनेजिंग कौन्सिलचे सदस्य रामशेठ ठाकूर हे असून प्रमुख पाहुणे, रयत शिक्षण संस्थेचे सहसचिव (ऑडिटर) प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे, सहसचिव (उच्च शिक्षण) प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे, रायगड विभागीय सल्लागार समितीचे चेअरमन बाळाराम पाटील हे उपस्थित राहणार आहेत.

सोहळा रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य जे.एम.म्हात्रे, अरुणशेठ भगत, महेंद्र घरत आदी मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांनी दिली आहे.

## अभियंत्यांमुळे देश नावारूपाला येतो -संजय शिरसाट

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

अभियंते हे निर्माणकर्ते असून त्यांच्यामुळे देश नावारूपाला येतो, असे उद्गार सिडकोचे अध्यक्ष संजय शिरसाट यांनी काढले. सिडको इंजिनिअर्स असोसिएशनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या अभियंता दिनाच्या कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते.



या कार्यक्रमास सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक शान्तनु गोयल, गणेश देशमुख, दिलीप ढोले, मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे, मुख्य महाव्यवस्थापक (परिवहन व विमानतळ) गीता पिल्लई, मुख्य अभियंता (नवी मुंबई आंतरराष्ट्रीय प्रकल्प व विशेष प्रकल्प) शीला करुणाकरन, मुख्य अभियंता (नवी मुंबई) एन. सी. बायस, व्यवस्थापक (कार्मिक) प्रमदा बिडवे, सिडको इंजिनिअर्स असोसिएशनचे अध्यक्ष सुरेश ठाकूर, सरचिटणीस एस. एस. नरसापूर यांसह सिडकोतील विभाग प्रमुख, अभियंते, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी अध्यक्ष शिरसाट यांनी सिडकोतील अभियंत्यांना अभियंता दिनाच्या शुभेच्छा देऊन नवी मुंबईच्या विकासामध्ये अभियंत्यांचा मोलाचा वाटा आहे. अभियंते हे देशाच्या विकासाचे आधारस्तंभ आहेत, असे मत व्यक्त केले. तसेच आपल्या कामातून अभियंत्यांनी आपली ओळख निर्माण करावी, असा संदेश दिला.

अभियंता दिन कार्यक्रमानिमित्त अद्वितीय कामगिरी स्पर्धातील वैयक्तिक तसेच सांघिक गटांतील विजेत्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. अद्वितीय कामगिरी स्पर्धे अंतर्गत वैयक्तिक गटात सहाय्यक कार्यकारी अभियंता प्रशांत चाहरे, श्रेयस बालपांडे यांना पारितोषिक प्रदान करण्यात आले. उत्कृष्ट शैक्षणिक कामगिरीकरिता किरण राजुरकर आणि डॉ. वीरेंद्र पाटील यांना पारितोषिक प्रदान करण्यात आले. सांघिक गटात कार्यकारी अभियंता (खारघर १ व खारघर २), कार्यकारी अभियंता (खारघर कोस्टल रोड) आणि कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा) यांच्या संघांना पारितोषिक प्रदान करण्यात आले.

यानंतर अपकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. महाव्यवस्थापक शेखर दास यांनी महाराष्ट्राज् लॉंगेस्ट टनेल ऑन समृद्धी महामार्ग ॲट इगतपुरी या विषयावर सादरीकरण केले. दुपारच्या सत्रात सुप्रसिद्ध स्टँडअप कॉमेडियन मंदार भिडे यांच्या कार्यक्रमाने अभियंता दिनाची सांगता झाली.

## उरणमध्ये विद्यार्थ्यांनी राबवले स्वच्छता अभियान



**उरण : वार्ताहर**

उरण शहरातील जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूटचे एनआय उरण या शाळेमधील आरएसपी विद्यार्थी व स्काऊट गाईड विद्यार्थ्यांनी गणपती विसर्जनाच्या स्वच्छता अभियान राबविले.

विमला तलाव परिसर गणपती विसर्जनाच्या दिवशी विमला तलाव परिसर स्वच्छ करण्यासाठी स्वच्छता अभियान राबविण्यात आले यावेळी विमला तलावा समोरील सर्व कचरा साफ केला. आपले उरण स्वच्छ उरण हे ब्रीद वाक्य ठेवून स्वच्छता अभियान केले.

या वेळी शाळेतील शिक्षक, आरएसपी विद्यार्थी, स्काऊट गाईड विद्यार्थी सोमीनाथ खरमाटे व मुकद्दर तडवी इत्यादी विद्यार्थी आदीनी या उपक्रमात सहभाग घेतला होता.

# शेतजमिनी कांदळवन घोषित होऊ नयेत

## दादर ग्रामस्थांचे खासदार धैर्यशील पाटील यांना साकडे

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील दादर गाव येथील २३०० एकर आणि रायगड जिल्ह्यातील अन्य काही ठिकाणची शेतकऱ्यांची शेतजमीन कांदळवनांनी व्यापली आहे. ही शेतजमीन वन विभागाचा एक भाग म्हणून पाहिली जात आहे. त्यामुळे ही शेतजमिनी कांदळवन घोषित होऊ नये यासाठी दादर गावातील ग्रामस्थांनी खासदार धैर्यशील पाटील आणि भाजप जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांना निवेदन दिले आहे.



सन १८८९च्या महापुरात दादर गावाची बंदिस्ती तुटली आणि शेती उद्ध्वस्त झाली. शेतकऱ्यांनी बंदिस्ती बांधण्यासाठी अनेकदा प्रयत्न केला, पण हे काम शेतकऱ्यांच्या कुवतीच्या बाहेरचे असल्याने शासनाला विनंती केली, परंतु कोणतीही मदत झाली नाही किंवा बंदिस्ती बांधण्यासाठी योजना राबवली गेली नाही. परिणामी कांदळवनाची वाढ होत गेली व पिकती शेती नापीक झाली. रिलायन्स कंपनीच्या माध्यमातून सेझ नावाखाली काही शेतकऱ्यांच्या जमिनी खरेदी केल्या गेल्या. या जमिनी सलग एका बाजूला नाहीत. शेतकऱ्यांच्या जमिनी आणि कंपनीने खरेदी केलेल्या जमिनी सरमिसळ आहेत. अशा स्थितीत शेतकऱ्यांना आपल्या जमिनी कांदळवन आणि खारेपाणी यापासून वाचवणे कठीण झाले. त्याचप्रमाणे शेती करणे दुरापास्त झाले असून सुमारे ३० वर्षांपूर्वी भाताचे कोठार असणारे दादर गाव आता कांदळवनाचे कोठार बनले आहे. त्यामुळे ग्रामस्थांना उपजीविकेसाठी मोठा संघर्ष करावा लागत आहे. इतर विभागात अतिवृष्टी झाल्यास, पूर आल्यास, दुष्काळ पडल्यास किंवा इतर कोणतेही नैसर्गिक आपत्ती उद्भवल्यास सरकार शेतकऱ्यांना सढळ हाताने मदत करते. कर्जमाफी केली जाते. नव्याने कर्ज दिले जातात. वेगवेगळ्या योजना राबविल्या जातात. शेतकऱ्यांना दिलासा दिला जातो, मात्र दादर गावच्या ग्रामस्थांचे कांदळवनामुळे उपजीविकेचे साधन हिरावून घेतले आहे. याचा विचार करण्यात यावा, अशी विनंती ग्रामस्थांनी खासदार धैर्यशील पाटील व जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांना निवेदन देऊन गावकऱ्यांनी केली आहे.

दादर गावच्या शेतजमिनीवर वन विभागाचा शिक्कामोर्तब करण्याचा प्रयत्न चालू आहे. तो थांबवावा, नाहीतर २० हजार लोकसंख्या असलेला दादर गाव देशोधडीला लागेल, असेही दादर गावच्या ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे. शासनाने आमच्या जमिनीबाबत कोणताही निर्णय घेण्यापूर्वी दादर गावच्या ग्रामस्थांचे म्हणणे ऐकून घ्यावे. भविष्यात आमच्या २३०० एकर जमिनी पुन्हा वापराखाली येतील या दृष्टीने प्रयत्न करावेत अशी आपल्या माध्यमातून सरकारला विनंती करावी, अशी मागणीही दादर गावच्या ग्रामस्थांनी केली आहे.

या वेळी दादर गावचे एम.के.सर, ए.बी. पाटील, स.रा. म्हात्रे, अभिनंदन पाटील, सुनीता जोशी, मोहन पाटील, धनाजी पाटील, पांडुरंग पाटील, सतीश जोशी, दिलीप ठाकूर, विवेक जोशी, संजीव पाटील, गजानन पाटील, नंदकुमार ठाकूर, रमाकांत ठाकूर, ज्ञानदेव पाटील, रामचंद्र घरत आदींसह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# कशेडी दुसरा भुयारी मार्ग उर्वरित कामासाठी बंद

## *पहिल्या भुयारातून दुहेरी वाहतूक*

**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावरील कशेडी घाटाला पर्यायी दोन भुयारी मार्गांपैकी नव्याने वाहतुकीस सुरू झालेल्या भुयारातील अंतर्गत अपूर्ण कामे पूर्ण करण्यात येणार आहेत. यासाठी या नवीन भुयारी मार्गातील वाहतूक बंद करण्यात आली आहे.

नवीन भुयारी मार्ग मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या महामार्ग दौऱ्यानंतर गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ५ सप्टेंबरपासून वाहतुकीस खुला करण्यात आला होता. गेल्या वर्षी गणेशोत्सव काळात एका भुयारी मार्गातून हलकी प्रवासी वाहने सोडण्यात आली होती. मात्र त्यानंतर पुन्हा तो भुयारी मार्ग वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आला होता. दुसऱ्या भुयारी मार्गाचे काम लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी वाहतूक बंद ठेवून काम वेगाने सुरू झाले. यंदा २५ फेब्रुवारीपासून शिमगोत्सवापूर्वीच कोकणात ये-जा करण्यासाठी लहान वाहनांना कशेडी घाटाला पर्यायी भुयारी मार्गाचा वापर करण्याची परवानगी देण्यात आली. यानंतर तब्बल एका वर्षाने अपूर्ण असलेला दुसरा भुयारी मार्गदेखील गणेशोत्सवाच्या प्रारंभी मुंबईहून कोकणात जाणाऱ्या वाहनांसाठी सुरू करण्यात आला. त्यामुळे चाकरमानी गणेशभक्तांचा प्रवास सुरळीत होऊन कशेडी घाटातील ४५ मिनिटांचा धोकादायक घाटरस्त्यामुळे वेळ वाचण्यासह इंधनाच्या बचतीसोबतच वाहतुकीच्या कोंडीपासून चाकरमानी सुखावले होते.

पाच दिवसांचे गौरी-गणपती विसर्जन आणि अनंत चतुर्दशीनंतर परतीचा प्रवास सुखकर होण्यासाठी राष्ट्रीय बांधकाम विभाग आणि स्थानिक वाहतूक पोलिसांनी नियोजन केल्याने कशेडी घाट व पर्यायी भुयारी मार्ग परिसरात वाहतूक कोंडी झाली नाही. त्यामुळे घाटाला पर्यायी मार्ग म्हणून याची उपयुक्तता सिद्ध झाली आहे.

# मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर अपघातात एक जण ठार

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर शुक्रवारी (दि. २०) पहाटे ३च्या सुमारास तीन वाहनांचा विचित्र अपघात झाला. यामध्ये एक जण जागीच ठार, तर तिघे किरकोळ जखमी झाले आहेत.

कार (एमएच १४ डीई ३७००)चा चालक अक्षय राजेंद्र पाटील (वय २५, रा. भोकरदन, जालना) पुण्याकडे चालला होता. एक्स्प्रेस वेवर पुणे लेनवर पनवेलच्या भाताण बोगद्याजवळ गॅस टँकर (युपी ७० एचटी १६०७)ला ओव्हरटेक करताना कारचालकाचा ताबा सुटल्याने ही कारणे टँकरला पाठीमागून धडकली. त्यामुळे पाठीमागून भरधाव वेगात येणाऱ्या ट्रक (एमएच ४३ सीई ७२९४)वरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने हा ट्रक उलटला. या वाहनांच्या विचित्र अपघातात कारमधील देवेंद्र सिंग करणसिंग राजपूत (वय २४, रा. पिशोर, ता.कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर) यांच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन त्यांचा जागीच मृत्यू झाला. तर राजेंद्र पाटील, सुरज कुदळे व अन्य एक असे तीन जण किरकोळ जखमी झाले आहेत.

# मालसई येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन, लोकार्पण

**धाटाव : प्रतिनिधी**

खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते रोहा तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत मालसई हद्दीतील विविध विकासकामांचे भूमिपूजन तसेच लोकार्पण करण्यात आले.

या कार्यक्रमास सुरेश मगर, विनोद पशिलकर, अनंत देशमुख, अनंत थिटे, नवनीत डोलकर, तंटामुक्ती अध्यक्ष घनश्याम कराळे, महेश बामुगडे, सरपंच मयुरी तुपकर, सदस्य, गाव कमिटी अध्यक्ष व पंच कमिटी, ग्रामस्थ उपस्थित होते.



या वेळी खासदार तटकरे यांनी या भागाच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कटिबद्ध असल्याचे सांगत मुठवली खुर्द ते डम्पिंग ग्राउंड रस्ता तसेच गावातील अंतर्गत रस्ते येत्या काही दिवसांतच पूर्ण करून देण्याचे आश्वासन दिले.

उडदवणे येथे डोंगरी विकास अंतर्गत श्री स्वामी समर्थ मठ सामाजिक सभागृह, सांगडे येथे जलजीवन मिशन नळपाणी पुरवठा, सांगडे येथील अंगणवाडी इमारत भूमिपूजन, मुठवली खुर्द येथे जलजीवन मिशन नळपाणी पुरवठा, डोंगरी विकास अंतर्गत महिला सामाजिक सभागृह, जनसुविधा अंतर्गत श्री भैरवीनाथ मंदिरासमोरील जोड आदी विकासकामांचे लोकार्पण तसेच भूमिपूजन करण्यात आले.

या कार्यक्रमात खासदार सुनील तटकरे यांचे वारकरी संप्रदाय ज्येष्ठ नागरिक हभप परिवारतर्फे धोतर, टोपी, उपरणे अशी वारकरी संप्रदायाची आठवण म्हणून भेट देऊन सत्कार करण्यात आला.

# अंजुमन इस्लाम महाविद्यालयास 'नॅक'चे बी प्लस मानांकन प्राप्त



**मुरूड : प्रतिनिधी**

अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्सला युजीसी संचलित नॅशनल असेसमेंट अ‍ॅण्ड अ‍ॅक्रिडिएशन काऊंसिल (नॅकद्वारे बी प्लस मानांकन प्राप्त झाले आहे.

नॅकद्वारे महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा तसेच विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सोयीसुविधांची तपासणी करण्यात येते. त्यानंतर उचित मानांकन देण्यात येते. या महाविद्यालयास प्रथम २०१९ साली बी मानांकन प्राप्त झाले होते. यानंतर पाच वर्षांनी पुन्हा नॅकद्वारे पडताळणी करण्यात आली. यासाठी नॅक पीअर टीममध्ये डॉ. के. एम. अबूबकर, चेअरमन डॉ. बुधीन गोगई, समन्वयक व डॉ. तरंजीत सूद, सदस्य म्हणून उपस्थित होते. महाविद्यालयाची पाहणी व सर्व बाबींची पडताळणी करून नॅकद्वारे या महाविद्यालयास बी प्लस मानांकन प्राप्त झाले आहे. या यशाबद्दल महाविद्यालयाचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.

हे यश संपादन करण्यामध्ये महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन जैनुद्दीन कादीरी, सदस्यांमध्ये इम्रान मलिक, तौसिफ़ फत्ते, इस्माईल शेख तसेच संस्थेचे अध्यक्ष अजीम खानझादा, सचिव हिफझुरेहमान नाझीरी, सहसचिव रहीम कबले, खजिनदार अल्ताफ मलिक व सर्वच विश्वस्तांचे मोलाचे सहकार्य लाभले. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. अमानुल्लाह पठाण, समन्वयक अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, सर्व शिक्षकांनी यासाठी अथक परिश्रम घेतले.

# कर्जत नगर परिषदेने केले अडीच टन निर्माल्याचे संकलन

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरात अनंत चतुर्दशीनिमित्त गणेश विसर्जन सोहळा पार पडला. शहरात पालिकेच्या वतीने बांधण्यात आलेल्या सर्व सात गणेश घटनांवर पालिकेच्या वतीने गणेशभक्तांकडून निर्माल्य संकलित करण्यात आले. यामधून तब्बल अडीच टन निर्मला गोळा झाले असून त्या निर्माल्यावर घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प येथे प्रक्रिया करून खत निर्मिती करण्यात येईल, अशी माहिती मुख्याधिकारी आणि प्रशासक वैभव गारवे यांनी दिली.



**खत निर्मिती करणार**

कर्जत शहरात गणेशोत्सव काळात पालिका प्रशासनाकडून कचरा कुठेही होणार नाही याची काळजी स्वच्छता आणि आरोग्य विभागाने घेतली तसेच गणेश विसर्जनाच्या वेळी उल्हास नदीच्या पात्रात कोणीही गणेशभक्त निर्माल्य सोडणार नाही याची काळजी घेण्यासाठी पालिकेने कर्मचारी तैनात केले होते. त्याचवेळी पालिकेकडून दवंडी पिटाळून गणेशभक्तांना आवाहनही करण्यात येत होते. अनंत चतुर्दशीनिमित्त मोठ्या प्रमाणात गणेशभक्त उल्हास नदीच्या घाटांवर गणेश विसर्जन सोहळ्यासाठी एकत्र येत असतात. कर्जत शहराच्या मध्यभागातून वाहणाऱ्या उल्हास नदीवर महावीर पेठ, दहिवली, बामचा मळा, मुद्रे तसेच शहरातील गुंडगे आणि अकुर्ले येथे असलेल्या गणेश घाटावर विसर्जन सोहळ्याची तयारी केली गेली होती.

शहरातील सर्व गणेश घाटावर निर्माल्य संकलित करण्यासाठी निर्माल्य कलश ठेवून देण्यात आले होते. त्या निर्माल्य कलशात सर्व भाविकांनी निर्माल्य टाकावे, असे आवाहन करण्यात येत होते. पालिका मुख्याधिकारी वैभव गारवे यांच्या मार्गदर्शनाखाली अविनाश पवार, सुदेश गायकवाड, बापू बहिरम, शुभम ढोले, रवींद्र लाड, बाबूलाल वाघेला, परेश गारूड, अमोल जाधव, मुकेश परदेशी, सुनील लाड, रवी सरवटे, प्रजेबल सोनावणे, रवी गायकवाड, केतन गायकवाड, आकाश परदेशी, जयेश घरत, कुणाल चव्हाण, निलेश फाळे, अनिल चंदन, तेजाळ सोनावणे, भूदेव चव्हाण, श्रीकांत वाघेला आदी अधिकारी व कर्मचारी दुपारी ४पासून रात्री साडे अकरापर्यंत तैनात होते.

पालिकेने राबवलेल्या उपक्रमामुळे कर्जत शहरातून वाहणाऱ्या उल्हस नदीमध्ये या वर्षी निर्माल्य पाण्यात वाहून जात नसल्याचे दिसून येत होते. दिवसभरात तब्बल अडीच टन निर्माल्य निर्माल्य कलशात संकलित झाले. हे सर्व निर्माल्य त्यानंतर रात्री गुंडगे येथे असलेल्या घन कचरा व्यवस्थापन प्रकल्प येथे नेण्यात आले असून तेथे त्या निर्मल्यापासून खतनिर्मिती केली जाणार आहे.

# गतिमंद मुलांच्या शाळेला फर्निचर भेट

**रोहे : प्रतिनिधी**

स्व. रमेश गुजर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ शहरातील प्रेरणा गतिमंद मुलांच्या शाळेला रोहातील गुजर कुटुंबीयांकडून फर्निचर भेट देण्यात आले.

या कार्यक्रमास माजी नगरसेवक महम्मद डबीर, अहमद दर्जी, जगदिश दामाणी, ज्येष्ठ पत्रकार अरुण करंबे, आनंद कुलकर्णी, महेंद्र गुजर, विलास गुजर, दर्शना आठवले, नुरी रोहावाला, दीपक आठवले, अशोक जोशी आदी उपस्थित होते.

या वेळी स्व. रमेश गुजर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ त्यांचा मुलगा महेंद्र गुजर, विलास गुजर व प्रशांत गुजर यांनी शाळेला दोन मोठे डिजिटल बोर्ड, टीपॉय व शाळेतील विद्यार्थ्यांना खाऊ वाटप केले.



# कै. श्रीधर लहाने यांना श्रद्धांजली



**माणगाव : प्रतिनिधी**

भारतीय मजदूर संघ रायगड जिल्ह्याचे माजी अध्यक्ष व मार्गदर्शक कै. श्रीधर दामोदर लहाने यांना भारतीय मजदूर संघाकडून गोरेगाव येथे श्रद्धांजली वाहण्यात आली.

या वेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी रायगड जिल्हा कार्यवाह विश्वास वर्तक, ज्यष्ठ स्वयंसेवक नारायण दळवी, भारतीय मजदूर संघाचे माजी प्रदेश उपाध्यक्ष रमेश गोविलकर, खजिनदार रवींद्र दानवे, जीवन प्राधीकरण संघटनेचे विवेकानंद काळे, पालकर, ढेपे आणि अन्य भारतीय मजदूर संघाचे सदस्य उपस्थित होते. उपस्थितांनी कै. लहाने यांच्या कार्याविषयी माहिती सांगून आठवणींना उजाळा दिला व भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

# माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमात उसर शाळेचे यश

**माणगाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने आयोजित केलेल्या मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा २ या स्पर्धेत तळा तालुक्यातील उसर खुर्द येथील छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचलित अभिनव ज्ञानमंदिरने माध्यमिक स्तरावर तळा तालुक्यात द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे.



सलग दुसऱ्या वर्षी विद्यालयाने ही किमया साधली आहे. शैक्षणिक, सामाजिक उपक्रम, विद्यार्थी गुणवत्ता, सुसज्ज इमारत व विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण उन्नतीसाठी शाळा विविधांगी उपक्रम राबवित असते. विद्यालयाचा इयत्ता दहावीचा निकाल सलग १३ वर्षे १०० टक्के लागत आहे. याबरोबरच केंद्रस्तर समिती, तालुका समितीने शाळेतील भौतिक सुविधा, विद्यार्थ्यांची गुणवत्ता, शासकीय अभिलेख क्रीडा, सांस्कृतिक, शिक्षक गुणवत्ता, शैक्षणिक पात्रता वाढ, शासकीय विद्यार्थी लाभाच्या योजना इत्यादी मानके तपासली व गुणांकन केले. या सर्व बाबीत शाळा अव्वल ठरून सलग दुसऱ्या वर्षी शाळेने द्वितीय क्रमांक पटकावला आहे. दोन लाख रोख रकमेचे हे पारितोषिक असून विद्यालयास प्राप्त झालेल्या या पुरस्कारामुळे कौतुक होत आहे.

बक्षीस मिळाल्याबद्दल संस्थेचे सरचिटणीस डॉ. निलेश रेवगडे, शालेय समितीचे अध्यक्ष किशोर अल्हाट, कार्याध्यक्ष श्रीकांत तरटे, उपकार्याध्यक्ष विश्वास सोनवणे, शालेय समिती सदस्य,विजय सावंत, शांताराम नटे, जि.प.च्या माजी सदस्य गीता जाधव, माजी समाज कल्याण सभापती हिराचंद तांबे, विद्यालयाचे माजी विद्यार्थी अ‍ॅड. उत्तम जाधव व सर्व ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

# चेन्नई कसोटीत बांगलादेशाचा डाव गडगडला

## बुमराहचा भेदक मारा; भारत दुसऱ्या डावात दिवसाखेर ३ बाद ८१ धावा

**चेन्नई : वृत्तसंस्था**

बांगलादेशविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात भारतीय संघाने पहिल्या डावात १० विकेट्स गमावत ३७६ धावा केल्या. प्रत्युत्तरात बांगलादेश केवळ १४९ धावाच करू शकला. भारताच्या वेगवान गोलंदाजांच्या प्रभावी माऱ्यापुढे बांगलादेशच्या फलदाजांना चांगली खेळी करता आली नाही. दुसऱ्या डावात दुसऱ्या दिवसअखेर भारतीय संघाने २३ षटकांत ३ बाद ८१ धावा केल्या आहेत.




बांगलादेशचा संघ जेव्हा फलंदाजीसाठी मैदानात उतरला तेव्हापासूनच भारतीय गोलंदाजांचा सामन्यात वर्चस्व राहिले. जसप्रीत बुमराह आणि आकाश दीपने बांगलादेशला सुरुवातीला धक्के दिले. बांगलादेशकडून शानमन इस्लामने २, झाकीर हसनने ३, कर्णधार नजमूल शांतोने २०, मोमिनूल हकने ०, मुस्तिफिझुर रहीमने ८, शाकीब अल हसनने ३२, लिटन दास २२, हसन महमूदने ९, मेहंदी हसनने २७, तस्किन अहमदने ११ धावा केल्या. भारताच्या बुमराहने चार, तर आकाश दीपने, रवींद्र जडेजा व मोहम्मद सिराज यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या. यासह बुमराहने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ४०० विकेट्सचा टप्पा पार केला. अशी कामगिरी करणारा तो भारताचा सहावा जलदगती गोलंदाज ठरला आहे.

तत्पूर्वी भारताने सकाळच्या सत्रात चार विकेट गमावल्या. त्यानंतर भारताच्या गोलंदाजांनी बांगलादेशच्या सर्व विकेट घेतल्या.भारताने दुसऱ्या डावाची फलंदाजी सुरू केली आहे. दुसऱ्या डावात यशस्वी जैस्वाल (१०), रोहित शर्मा (५) आणि विराट कोहली (१७) धावा करून बाद झाला. शुबमन गिल ३३ धावांसह खेळपट्टीवर टिकून आहे.

# दिग्गज क्रिकेटपटू पुन्हा मैदानात!

## लीजेंड्स लीग क्रिकेट स्पर्धेचा थरार



**जोधपूर : वृत्तसंस्था**

जागतिक क्रिकेटमधील दिग्गज क्रिकेटपटू लीजेंड्स लीग क्रिकेटच्या माध्यमातून पुन्हा एकदा मैदानात असणार आहेत. सहा संघ एका ट्रॉफीसाठी मैदानात असतील.

या स्पर्धेला जोधपूरमधून सुरुवात झाली असून सुरुवातीचे सहा सामने येथे खेळवले जातील. त्यानंतर २७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत सुरत येथे सामने होतील. ३ ते ७ ऑक्टोबरपर्यंत जम्मूत सामन्यांचा थरार रंगेल. अखेरचे काही सामने ९ ऑक्टोबरपासून श्रीनगर येथे होतील, तर, चेन्नई येथे १६ ऑक्टोबर रोजी अंतिम सामना खेळवला जाईल.

या स्पर्धेत यंदा अलीकडेच आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त झालेला शिखर धवन दिसणार आहे. याशिवाय दिनेश कार्तिकदेखील दिसेल. लीजेंड्स लीग क्रिकेटचे लाईव्ह सामने स्टार स्पोर्ट्सवर पाहता येतील. याशिवाय फॅनकोड ॲपवर चाहत्यांना ही स्पर्धा पाहता येईल.

### संघ व कर्णधार

इंडिया कॅपिटल्स : कर्णधार इयान बेल, गुजरात जायंट्स : कर्णधार शिखर धवन, कोणार्क सूर्या ओडिशा : कर्णधार इरफान पठाण, मणिपाल टायगर्स : कर्णधार हरभजन सिंग, सदर्न सुपरस्टार्स : कर्णधार दिनेश कार्तिक, अर्बनरायजर्स तोयम हैदराबाद : कर्णधार सुरेश रैना.

# पेण येथे टेनिस बॉल क्रिकेट निवड चाचणी

**नागोठणे : बातमीदार**

ट्रॉफी फाईटर्स फाउंडेशन व रायगड जिल्हा टेनिस बॉल क्रिकेट संघटनेच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय ज्युनिअर (१९ वर्षाखालील) मुले व मुली यांची टेनिस बॉल क्रिकेट निवड चाचणी पेण प्रायव्हेट हायस्कूल मैदानावर रविवारी (दि. २२) सकाळी ९ वाजता आयोजित करण्यात आली आहे.

या निवड चाचणीसाठी ३० सप्टेंबर २००५नंतरचा जन्म असणारे खेळाडू पात्र राहतील. खेळाडूंनी आधार कार्ड, लिव्हिंग सर्टिफिकेट, शाळेचे बोनाफाइड सर्टिफिकेट, प्राचार्यांने प्रमाणित केलेले जन्म प्रमाणपत्र किंवा बोर्ड सर्टिफिकेट (कोणताही एक पुरावा) सोबत आणणे अनिवार्य आहे.

या चाचणीतून निवडलेले खेळाडू २८ ते ३० सप्टेंबर रोजी नंदुरबारच्या जीटीबी कॉलेज नंदुरबार येथे होणाऱ्या ज्युनिअर राज्यस्तरीय टेनिसबॉल क्रिकेट स्पर्धेसाठी रायगड जिल्ह्याच्या संघाचे प्रतिनिधित्व करतील, तर राज्यस्तरीय स्पर्धेतून निवडलेले खेळाडू सुंदरनगर (हिमाचल प्रदेश) येथे १० ऑक्टोबर रोजी सुरू होणाऱ्या राष्ट्रीय टेनिसबॉल क्रिकेट स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करतील.

जिल्हास्तरीय टेनिस क्रिकेट निवड चाचणीसाठी इच्छुक मुले, मुली, पुरुष व महिला खेळाडूंनी तसेच संघ, शाळा, क्लब यांनी उपस्थित रहावे. अधिक माहितीसाठी संदीप गुरव (नागोठणे, ९९६०७०२५१०), सुधाकर म्हात्रे (पेण, ९९८७०६५५९९), अजिंक्य पाटील (कर्जत, ७३८७८८४४६६), महेश म्हात्रे (पेण, ९८५०१८९९४४), सुशिल म्हात्रे (पेण, ८९८३३४२५६१), किरण पाटील (पेण, ९८५०१२७२८१), नरेश म्हात्रे (पेण, ७६६६४०६७६१), सतीश पाटील (पेण, ९३२६७७३६३६), दत्तात्रेय म्हात्रे (पनवेल, ९५९४६३१७८७) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन रायगड जिल्हा टेनिसबॉल असोसिएशन व ट्रॉफी फाईटर्स फाऊंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे.

# विक्रम राठोड राजस्थान रॉयल्सचे फलंदाजी प्रशिक्षक

**जयपूर : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचे माजी मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड आगामी आयपीएल हंगामात राजस्थान रॉयल्सच्या संघाला मार्गदर्शन करताना दिसतील. याशिवाय त्यांचे जवळचे सहकारी विक्रम राठोड यांच्यावर राजस्थानच्या फ्रँचायझीने फलंदाजी प्रशिक्षकाची जबाबदारी सोपवली आहे. त्यामुळे द्रविड आणि राठोड हे पुन्हा एकदा एकत्र काम करताना दिसतील.

टीम इंडियाला ट्वेंटी-२० विश्वचषक जिंकून देण्यात मोलाची भूमिका बजावणारे द्रविड आता नवीन आव्हान स्वीकारण्यासाठी सज्ज झाले आहेत. ते आता आयपीएलमधील राजस्थान रॉयल्सच्या संघाचे प्रशिक्षक म्हणून काम पाहतील. आता त्यांच्या ताफ्यात त्यांच्या सहकाऱ्याचीदेखील एन्ट्री झाली आहे. राजस्थानच्या फलंदाजांना विक्रम राठोड यांच्या अनुभवाचा फायदा होईल असे अपेक्षित आहेत. त्यांनी टीम इंडियासाठी सात वन डे आणि सहा कसोटी सामने खेळले आहेत. ते २०१९ ते २०२३पर्यंत भारतीय संघाचे फलंदाजी प्रशिक्षक राहिले आहेत. त्यांनी त्यांच्या कार्यकाळात रिषभ पंत, शुबमन गिल आणि लोकेश राहुल यांसारख्या खेळाडूंना स्टार बनवण्यात हातभार लावला.

# पनवेल महापालिकेतर्फे कळंबोलीच्या केएलई महाविद्यालय येथे क्रिकेट स्पर्धा




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्वच्छ भारत अभियानाच्या दहाव्या वर्धापन दिनानिमित्त केंद्रीय गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालय, केंद्रीय पेयजल व स्वच्छता मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत स्वच्छता ही सेवा मोहीम राबविण्यात येत आहे. स्वभाव स्वच्छता संस्कार स्वच्छता या संकल्पनेसह स्वच्छता ही सेवा मोहिमेंतर्गत कळंबोलीतील केएलई महाविद्यालयात क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छतेच्या प्रयत्नांमध्ये सामूहिक कृती आणि नागरिकांची शहर स्वच्छतेतील सहभागाची भावना प्रज्वलित करण्यासाठी स्वच्छता ही सेवा मोहीम आयोजित करण्यात आलेली आहे. या मोहिमेंतर्गत कळंबोलीतील केएलई महाविद्यालयात आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेमध्ये ११ संघांनी सहभाग घेतला. स्वच्छतेचे महत्त्व सांगणारे बॅनर्स या ठिकाणी सर्वत्र लावण्यात आले होते.

या वेळी केएलई महाविद्यालयाचे प्राचार्य विजय तेंडुलकर, महापालिकेचे अधिकारी अमित जाधव, शितल घारगे, कर्मचारी उपस्थित होते.

स्वच्छता हीच सेवा या मोहिमेंतर्गत १७ सप्टेंबरपासून २ ऑक्टोबर या कालावधीत पालिका क्षेत्रात विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. महापालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांनी स्वच्छता ही आपली जीवपपद्धती बनविण्यासाठी प्रतिज्ञा करून स्वच्छ भारत अभियानामध्ये सहभागी होण्याचे आवाहन घनकचरा व आरोग्य विभागाचे उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी केले आहे.







**पनवेल : देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती या काळात भारतीय जनता पक्षाच्या वतीने विविध सेवाकार्य असलेल्या सेवा पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पनवेल तालुका व शहर युवा मोर्चाच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिराचे उद्घाटन शुक्रवारी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिरास प्रतिसाद लाभला.**








सौजन्य : प्रतिक पाटील

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com